संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

नोव्हेंबर २०२५। पृष्ठे : ५२

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

## कुष्ठरोग

मानवतेचा स्पर्श... बदलाची सुरुवात.

**कुष्ठरोग स्पर्शाने पसरत नाही.**
**उपचाराने पूर्ण बरा होतो. कलंक नाही-स्वीकृती हवी.**



मुक्तस्पर्श

# राज्यात कुष्ठरोग आता ‘नोटिफायबल डिसीज

## सर्व रुग्णांची नोंदणी बंधनकारक

मुंबई - राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने कुष्ठरोगाला ‘नोटिफायबल डिसीज’ म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा ,कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

कुष्ठरोग हा मायकोबॅक्टेरीयम लेप्री या जंतुमुळे होणारा संसर्गजिन्य आजार असून त्वचा, परिघीय नसा, डोळे आणि इतर अवयवांवर त्याचा परिणाम होतो. या आजाराबद्दल समाजात अजूनही भीती, गैरसमज आणि भेदभाव कायम आहेत. लवकर निदान न झाल्यास आणि उपचारात विलंब झाल्यास रुग्णांमध्ये विकृती (दर्जा 2 डिसॅबिलिटी) निर्माण होते. त्यामुळे वेळेत निदान आणि संपूर्ण औषधोपचार हे कुष्ठरोग नियंत्रणाचे प्रमुख घटक असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्य शासनाने सन 2027 पर्यंत “कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र” हे उद्दिष्ट ठेवले आहे. यामध्ये संसर्गाची साखळी पूर्णपणे तोडणे, प्रसार शून्यावर आणणे, मुलांमधील विकृतीचे प्रमाण शून्य करणे आणि कुष्ठरुग्णांविषयी समाजातील भेदभाव नष्ट करणे या बाबींचा समावेश आहे. कुष्ठरोग नियंत्रणासाठी सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील सर्व डॉक्टर, पॅथॉलॉजिस्ट, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ, आरोग्य कर्मचारी आणि क्षेत्रीय अधिकारी यांनी निदान झालेल्या सर्व रुग्णांचा योग्य उपचार, पाठपुरावा तसेच त्यांच्या संपर्कातील व्यक्तींना पोस्ट एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (पीईपी) देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत, सप्टेंबर 2025 अखेर राज्यात 7,863 नव्या कुष्ठरुग्णांची नोंद झाली असून उपचाराखालील रुग्णांची संख्या 13,010 आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांना कुष्ठरोग निदान व नोंदणीसंबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांनाही कुष्ठरोगाबाबत भीती बाळगू नये, लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क साधावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कारण हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो—फक्त वेळेत निदान आणि उपचार आवश्यक आहे.



RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन राजपत्र**

**असाधारण भाग चार-अ**

वर्ष ११, अंक १३६] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय, संकुल इमारत, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१, दिनांक ३० ऑक्टोबर २०२५.

**अधिसूचना**

**साथरोग अधिनियम.**

क्रमांक कुनिका-१२२५/प्र.क्र.१७/संसआ-२.— ज्याअर्थी, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, भारत सरकार यांनी त्यांच्या अ.शा. पत्र क्रमांक झेड-१४०२०/०५/२०२५-एलईपी., दिनांक १४ मे २०२५ द्वारे, कळविले आहे की, जागतिक कुष्ठरोग धोरण २०२१-२०३० शी सुसंगत, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने, राज्यातील निदान झालेल्या सर्व प्रकरणांचे अहवाल अनिवार्यपणे देऊन कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्याच्या दिशेने होत असलेल्या प्रगतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय धोरणात्मक योजना २०२३-२०२७ चा प्रारंभ केला आहे आणि राज्यात कुष्ठरोगाला "अधिसूचित आजार" म्हणून घोषित करण्याचे विचारात घेणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य आजार असून देशातील एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. जर त्याचे लवकर निदान झाले नाही आणि लवकर उपचार केले नाहीत तर, त्यामुळे, शारीरिक व्यंग, विकलांगता व लक्षणीय आजार होऊ शकतात. हा आजार सामाजिक कलंक आणि भेदभावाशी देखील संबंधित आहे;

आणि ज्याअर्थी, कुष्ठरोग हा बहुविध औषधोपचाराच्या (एमडीटी) पूर्ण उपचारांमुळे बरा होणारा आजार असून लवकर निदान आणि त्यानंतर पूर्ण उपचार हा कुष्ठरोग प्रतिबंध आणि नियंत्रण धोरणाचा आधारस्तंभ आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य शासन, कुष्ठरोगाचे प्रमाण कमी करण्यास वचनबद्ध आहे आणि शासनाने, सलग पाच वर्षांमध्ये देशात एकही कुष्ठरोगी बालक नसल्यास आणि त्यानंतर पुढील तीन वर्षांमध्ये एकही कुष्ठरोगी नसल्यास दिला जाणारा “कुष्ठरोगमुक्त दर्जा” प्राप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे;

आणि ज्याअर्थी, हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील डॉक्टर, विकृतिशास्त्रज्ञ, सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ व आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांसह सर्व आरोग्य कर्मचारी व क्षेत्रीय कार्याधिकारी यांनी कुष्ठरोग झाल्याचे निश्चित झालेल्या सर्व रुग्णांना योग्य

(१)

भाग चार-अ-४७३—१

महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका

वर्ष : सत्ताविसावे | अंक : ११ | महिना : नोव्हेंबर २०२५

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक :
**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक आरोग्य सेवा,पुणे

संपादक :
**डॉ.कैलास बाविस्कर**
उपसंचालक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

संपादन सहाय्य :
**डॉ. संजय जठार**
सहाय्यक संचालक आरोग्य सेवा

**प्रशांत तुपकरी**
आरोग्य शिक्षण आधिकारी

**e-आवृत्ती**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता

संपादक,
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.

दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.

फॅक्स : ०२०-२६६१०१८०

e-mail :
ddhsiec.creatives@gmail.com



## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडून आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची पाहणी

## मोबाईल हेल्थ

/MahaArogyaIECBureau @Mahahealthiec @Mahahealthiec @Mahahealthiec

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

नोव्हेंबर - २०२५



४७ कोल्हापूर जिल्हा क्षयमुक्त करण्याचा संकल्प, आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते 94 ग्रामपंचायतीच्या सरपंचांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान



४९ कोल्हापूर जिल्ह्यातील विविध आरोग्य सेवांचा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला आढावा



५१ मानसिक आरोग्यासाठी राज्यात लवकरच विशेष पथदर्शी प्रकल्प राबविणार आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती

# अंतरंग


- आयुक्तांचे मनोगत ........ ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ........ ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ........ ७
- संपादकीय ........ ८
- कुष्ठरोग शोध अभियान ........ ९
- 'संवेदनेचा प्रवास' ........ ११
- जागतिक लसीकरण दिन ........ १३
- आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडून आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची पाहणी ........ १५
- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यात शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापनेला मंत्रिमंडळाची मंजुरी ........ १६
- रक्तदान : एक जीवनदायी कार्य ........ १८
- पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे ........ २०
- मुख आरोग्य ........ २२
- मानसिक आरोग्य ........ २३
- ‘समुदाय विकासासाठी लोकसहभाग आणि समन्वय' यावर एकदिवसीय चर्चासत्र ........ २५
- कुटुंबाच्या आरोग्याची साखळी मजबूत करणारा उपक्रम केअर कम्पॅनियन प्रोग्राम (CCP) ........ २६
- मालेगावच्या प्रा.आ.केंद्र मेडशीस 'NQAS'पथकाची भेट : आरोग्य सेवेचे मूल्यांकन ........ २८
- कुष्ठरोग निवारण पंधरवडा : नियोजनपूर्वक कुष्ठरोगाचे उच्चाटन ........ २९
- जागतिक प्रतिजैविके जागरूकता सप्ताह ........ ३२
- यशोगाथा: धैर्याची दीपस्तंभ आशा स्वयंसेविका ........ ३४
- मेळघाटात चादरची झोळी अन् खाट अंगावर घेत जंगल पार केले... मातेला पोहोचविले दवाखान्यात! ........ ३५
- ग्रामगीता : श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह ........ ३६
- क्षयरुग्णांच्या मदतीसाठी आयोजित निक्षय गीत मैफिलीस प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद ........ ४१
- आईच्या उदरात वाढणाऱ्या जगाला स्पर्श करणारा एक दिवस .... ........ ४२
- आशा कौशल्य विकास कार्यक्रम ........ ४३

**कविता**

- कुष्ठरोग शोध अभियान ........ ४४
- चिमुकल्यांचे पोषण - पोषण दूत ........ ४५
- नवचेतना ........ ४६

**वृत्त विशेष**

- कोल्हापूर जिल्हा क्षयमुक्त करण्याचा संकल्प ........ ४७
- आयुष्मान कार्ड निर्मिती व वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ........ ४८
- कोल्हापूर जिल्ह्यातील विविध आरोग्य सेवांचा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला आढावा ........ ४९
- लेखकांना विनंती ........ ५०
- मानसिक आरोग्यासाठी राज्यात लवकरच विशेष पथदर्शी प्रकल्प राबविणार आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती ........ ५१

# आयुक्तांचे मनोगत



आरोग्यदायी जीवनशैली ही केवळ सवय नाही, ती दीर्घकालीन आरोग्य गुंतवणूक आहे. नोव्हेंबर महिन्यात साजरा होणारा राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन आपल्याला याची जाणीव करून देतो. कर्करोग हा आज जगभरातील सर्वात गंभीर सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा बनला आहे. कर्करोगामध्ये स्तन कर्करोग, गर्भाशयमुखाचा कर्करोग आणि मुख कर्करोग हे तीन प्रकार सर्वाधिक आढळतात.

महिलांमध्ये सर्वाधिक आढळणारा आजार म्हणजे स्तन कर्करोग. योग्य वेळी तपासणी केली गेल्यास आणि प्राथमिक अवस्थेत निदान झाले तर त्यावर यशस्वी उपचार शक्य आहेत. स्वतःच्या शरीरातील बदल ओळखणे, मासिक तपासणी करणे आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे हे प्रत्येक महिलेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयांत स्तन कर्करोग तपासणी केंद्रे कार्यरत असून, महिलांना जागरूक करण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जाते.

कर्करोगाचा दुसरा गंभीर प्रकार म्हणजे गर्भाशयमुखाचा कर्करोग. हा आजार बहुधा दीर्घकाळ लक्षणविरहित राहतो, म्हणून तपासणी अत्यावश्यक आहे. तपासणीद्वारे गर्भाशयमुखातील बदल वेळेत ओळखता येतात. सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान व कुटुंब कल्याण विभागातर्फे महिला आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात, ज्यात ही तपासणी मोफत केली जाते. गर्भाशयमुख कर्करोगावर एचपीव्ही लस उपलब्ध असून, ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना ती देण्याबाबत जनजागृती वाढवणे हेही या अभियानाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

तिसरा, आणि पुरुष व महिलांमध्ये समान प्रमाणात आढळणारा प्रकार म्हणजे मुख कर्करोग. तंबाखू, गुटखा, मद्यपान यांसारख्या व्यसनांमुळे हा आजार होतो. एकदा झाला की उपचार जरी झाले तरी त्याचा शारीरिक आणि मानसिक परिणाम दीर्घकाळ टिकतो. व्यसनमुक्त जीवनशैली हीच या आजारावरील सर्वोत्तम औषधी आहे. राज्यात तंबाखूमुक्त ग्राम अभियान, व्यसनमुक्ती केंद्रे आणि मुख कर्करोग तपासणी शिबिरे आयोजित करून या दिशेने ठोस प्रयत्न केले जात आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या "स्वस्थ नारी, सशक्त परिवार" अभियानात ७५ लाखांहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली, ज्यात स्तन व गर्भाशयमुख तपासणीसाठीही मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. या अभियानाने महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकतेची नवी लाट निर्माण केली आहे. कर्करोग प्रतिबंधासाठी आवश्यक आहे - संतुलित आहार, व्यायाम, नियमित तपासणी, तंबाखू आणि मद्याला नकार, तसेच मानसिक स्थैर्य. नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबीयांची काळजी घेणे, तसेच आरोग्य तपासणीसाठी नियमित आरोग्य केंद्राशी संपर्क ठेवून तपासणी करणे आवश्यक आहे.

कर्करोगाचा सामना करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आरोग्य विभाग, स्वयंसेवी संस्था, आणि जनतेच्या सहभागातूनच "कर्करोगमुक्त महाराष्ट्र" हे स्वप्न साकार होईल, असा विश्वास वाटतो. आपण सर्वांनी मिळून निरोगी समाजाच्या दिशेने एक मजबूत पाऊल टाकू या.

**डॉ. कादंबरी बलकवडे**
आयुक्त, आरोग्य सेवा
तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

# संचालकांचे मनोगत



हवामानातील बदल हे आजच्या काळातील सर्वात मोठे सार्वजनिक आरोग्याचे आव्हान बनले आहे. ऋतूंमधील अनियमितता, प्रदूषण, तापमानातील चढ-उतार, यामुळे संसर्गजिन्य तसेच असंसर्गजिन्य आजारांचे प्रमाण वाढताना दिसते. विशेषतः नोव्हेंबरपासून सुरू होणारा हिवाळा हा लहान मुलं, नवजात बालकं, जेष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजार असणाऱ्या व्यक्तींसाठी अधिक संवेदनशील काळ असतो.

थंडीच्या काळात श्वसनसंस्थेशी संबंधित आजार जसे की सर्दी, खोकला, दमा, न्यूमोनिया यांचे प्रमाण वाढते. तापमानातील घसरण आणि आर्द्रतेतील बदल यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे शरीर उबदार ठेवणे, पौष्टिक आहार घेणे, स्वच्छता राखणे आणि लसीकरण पूर्ण करणे हे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने या काळात हिवाळ्यातील आजार प्रतिबंध जनजागृती अभियान राबविले जाते. प्राथमिक आरोग्य केंद्रांवर प्रतिबंधात्मक उपचार आणि आवश्यक औषधे उपलब्ध करून दिली जातात.

हवामानातील बदलांचा सर्वाधिक परिणाम नवजात बालकांवर होतो. थंडीपासून संरक्षण, योग्य कपडे, उबदार वातावरण, मातेकडून होणारे स्तनपान आणि स्वच्छतेचे पालन ही नवजात काळजीची चार प्रमुख तत्त्वे आहेत. नोव्हेंबर महिन्यात 'नवजात बालक काळजी सप्ताह' साजरा केला जातो. या सप्ताहाचे उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक बालकाला जीवनाच्या पहिल्या दिवसापासून सुरक्षित व निरोगी वातावरण मिळावे. या काळात आशा, परिचारिका, आणि आंगणवाडी सेविका घराघरांत जाऊन मातांना नवजात बालकाच्या काळजीबाबत मार्गदर्शन करतात.

महिलांचे आरोग्य निरोगी असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते. मातांचे आरोग्य आणि नवजात बालकांची काळजी या दोन्ही गोष्टी एकमेकांशी घट्ट निगडीत आहेत. त्यामुळे गरोदरपणातील नियमित तपासणी, सुरक्षित प्रसूती, आणि प्रसूतीनंतरचे योग्य पोषण व स्तनपान या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. हवामानातील बदलाला आपण रोखू शकत नाही, पण त्याचे परिणाम कमी करू शकतो. पर्यावरणस्नेही जीवनशैली, स्वच्छता, व्यायाम, आणि आरोग्याबाबत जागरूकता, या गोष्टींनी आपण निरोगी समाजाच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, मुंबई

# संचालकांचे मनोगत



लसीकरण हे आधुनिक आरोग्यशास्त्रातील सर्वात प्रभावी आणि परिणामकारक शस्त्र आहे. "प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपचार" या तत्त्वाचा सर्वाधिक यशस्वी अविष्कार म्हणजे लस. दरवर्षी १० नोव्हेंबरला साजरा होणारा जागतिक लसीकरण आपल्याला या अमूल्य आरोग्य साधनाचे महत्त्व पुन्हा जाणवून देतो. भारताने लसीकरणाच्या क्षेत्रात जगभरात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशभरात राबविण्यात येणा-या 'सर्वांसाठी लसीकरण' या अभियानामुळे पोलिओ, धनुर्वात, गोवर, क्षयरोग, हिपॅटायटिस-बी यांसारख्या अनेक आजारांवर नियंत्रण मिळवता आले आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत असून, प्रत्येक बालक आणि गरोदर मातेला लसीकरणाचे पूर्ण संरक्षण कवच देणे हे आमचे ध्येय आहे.

प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या लसीकरणाच्या वेळापत्रकानुसार पूर्ण डोस घ्यावा. अनेकदा अज्ञान, भीती किंवा गैरसमजांमुळे काही पालक लसीकरण टाळतात. परंतु हे दुर्लक्ष भविष्यात गंभीर आजारांना आमंत्रण देऊ शकते. लस ही केवळ वैयक्तिक सुरक्षा नव्हे, तर सामाजिक जबाबदारी आहे, कारण जेव्हा संपूर्ण समाज लसीकरण पूर्ण करतो, तेव्हा 'समूह प्रतिकारशक्ती निर्माण होते आणि संसर्गजन्य आजारांचे प्रमाण घटते.

आरोग्य विभागाच्या वतीने मिशन इंद्रधनुष्य, पल्स पोलिओ अभियान, मातृ व बाल लसीकरण शिबिरे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रांद्वारे जनजागृती उपक्रम सातत्याने राबवले जातात. प्रत्येक आशा, आरोग्य सेविका, आणि आंगणवाडी कार्यकर्ती ही या यशाची खरी आधारस्तंभ आहे. नुकत्याच झालेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानात ७५ लाखांहून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली. या महिलांपैकी अनेकांनी स्वतःचे आणि आपल्या बालकांचे लसीकरण करून घेतले. त्याचप्रमाणे याविषयी जनजागृतीही करण्यात आली.

लसीकरण हा आजारांपासून बचावाचा सर्वात सोपा आणि सुरक्षित मार्ग आहे. त्यामुळे प्रत्येक पालक, प्रत्येक नागरिकाने लसीकरणात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. या जागतिक लसीकरण दिनानिमित्त, आपण सर्वांनी संकल्प करूया — प्रत्येक बालकाचे संपूर्ण लसीकरण करून निरोगी आणि सुरक्षित भविष्य निश्चित करू या आणि याच भावनेतून निरोगी, सक्षम आणि सशक्त महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करू या.

**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक, पुणे

# संपादकीय

सार्वजनिक आरोग्य सेवेत रोगनिदानाला महत्त्व असून प्राथमिक आरोग्य सेवा व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा यासाठी निदान व उपचार या सेवा प्रदान करण्यासाठी विविध उपक्रम व मोहिमा हाती घेतल्या जातात. कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्यासाठी कुष्ठरोग शोध अभियान राज्यात राबविण्यात येत आहे. कुष्ठरोगाला हद्दपार करण्यासाठी मोहीम राज्यात राबविली जात असून या रोगाचा असणारा कलंक मिटवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यात येत आहे. कुष्ठरोग शोध मोहिमेअंतर्गत घरोघरी सर्वेक्षणाद्वारे समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून त्याला त्वरित उपचाराखाली आणण्यासाठी ही विशेष अभियान राज्यात राबविले जात आहे.

जवळपास . कोटी लोकांची तपासणी या मोहिमेअंतर्गत करण्यात येत असून सुमारे एक कोटी  लाख घरांचे यात सर्वेक्षण होणार आहे. आरोग्य पथके, आशा स्वयंसेवक यांच्या माध्यमातून घरोघरी भेटी देऊन निदानाद्वारे कुष्ठरोग संशयित रुग्णांचा शोध घेतला जात आहे. समाजातील समाजातील कुष्ठरोगांना मानवतेची वागणूक मिळावी यासाठी ही जनजागृतीवर भर दिला जात आहे. जनसंपर्काच्या विविध माध्यमातून स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात, केबल टीव्ही द्वारे आवाहन, स्थानिक रेडिओवर आवाहन, शालेय प्रवास फेरी, खासगी वैधकीय कार्यशाळा अशा विविध माध्यमांच्याद्वारे समाजामध्ये कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात येत आहे.

कुष्ठरोग मुक्त गाव अभियान हे सुध्दा राज्यात राबविले जात आहे. जिल्ह्यात कार्यरत असणारे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी यांच्या मार्फतही व्यापक प्रमाणावर जनजागृतीचे नियोजन करण्यात आले असून, वृत्तपत्रे व इतर माध्यमातून प्रसिध्दी पत्रकाच्या द्वारे मोहिमेचे वृत्त जनसामान्यांपर्यंत पोहोचविले जात आहे. जनसामान्यांपर्यंत आरोग्याचे संदेश देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग सज्ज असून विविध माध्यमांद्वारे जनजागृतीचे कार्य प्रभावीपणे केले जात आहे. यामुळे ग्रामीण पातळीवरील जनतेचा विश्वास आरोग्य सेवेवर वाढत असून रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभाग तसेच सार्वजनिक आरोग्य विभागात विभागामार्फत पुरविण्यात येत असलेल्या सोया व सुविधा यांचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या व्यापक प्रमाणे वाढते आहे.

रुग्णांच्या मनात वाढत असलेला सार्वजनिक आरोग्य सेवेचा विश्वास हा राज्याच्या दृष्टीने आरोग्य सेवेतील एक महत्त्वाचे पाऊल असून जनसामान्यांवरील आरोग्यावरचा खर्च कमी होण्यास या प्रयत्नांना महत्त्वाचे स्थान असणार आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा ही अधिक लोकाभिमुख होत असून सामान्य माणसावरचा विश्वास या माध्यमातून अधिक दृढ होत आहे. जनसेवेचे एक कार्य अधिक महान होऊन सर्वसामान्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग प्रयत्न करत आहे. यात आरोग्य सेवेतील सर्व टीमचा मोठा सहभाग आहे.

संपादक
**डॉ.कैलास बाविस्कर**
उपसंचालक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

# कुष्ठरोग शोध अभियान

## राज्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान व्यापक सर्वेक्षण आणि घरोघरी तपासण्या

मुंबई - राज्यात कुष्ठरोग निर्मूलनाच्या दिशेने निर्णायक पाऊल म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कुष्ठरुग्ण शोध अभियान दि. 17 नोव्हेंबर ते 02 डिसेंबर 2025 दरम्यान राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मागील पाच वर्षांपासून हे अभियान सातत्याने राबविले जात असून, यंदाच्या वर्षी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आणखी व्यापक सर्वेक्षणाद्वारे समन्वयित आणि लक्ष्याभिमुख नियोजन करण्यात आले आहे.

राज्यातून सन 2027 पर्यंत 'शून्य कुष्ठरोग प्रसार' साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवून ही मोहीम राबविली जात आहे. लक्षणे आढळूनही अनेक रुग्ण उपचारासाठी पुढे येत नाहीत किंवा आजाराची जाणीव नसल्यामुळे निदान उशिरा होते. अशा लपलेल्या रुग्णांचा शोध घेऊन त्यांना त्वरित औषधोपचार मिळवून देणे, तसेच समाजातील कुष्ठरोगाविषयीचे गैरसमज, भीती व कलंक दूर करणे हे अभियानाचे प्रमुख ध्येय आहे.

### अभियानाचे स्वरूप आणि लक्षित लोकसंख्या

राज्यातील 8.66 कोटी लोकसंख्या या सर्वेक्षणात सामाविष्ट करण्यात येणार असून, 1 कोटी 73 लाख 25 हजारांहून अधिक घरांना प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली जाणार आहे. ग्रामीण भागातील 100 टक्के लोकसंख्या व शहरी भागातील 30 टक्के जोखीमग्रस्त वस्त्या सर्वेक्षणासाठी घेण्यात आले आहेत. या व्यापक मोहिमेसाठी राज्यात 65,832 पथके आणि 13,166 पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक पथकात एक आशा व एक पुरुष स्वयंसेवक असे दोन सदस्य असतील. पथके मोहीम कालावधीत सलग 14 दिवस घरोघरी जाऊन सर्व सदस्यांची प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करतील. ग्रामीण भागात दररोज 20 घरे, तर शहरी भागात 25–30 घरे तपासण्याचे उद्दिष्ट आहे.

### आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आवाहन

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तसेच जिल्ह्याधिकारी व गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन करून आपल्या प्रभावी नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबिटकर यांनी केले आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी या अभियानाचा सखोल आढावा घेतला आणि सर्व जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले आहे. राज्यातील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले असून, कुष्ठरोगावरील उपचार पूर्णपणे मोफत, प्रभावी आणि सर्व सरकारी आरोग्य यंत्रणेमार्फत सहज उपलब्ध असल्याची माहितीही आरोग्य विभागाने दिली आहे.



### तपासणीची पद्धत आणि निदान प्रक्रिया

पथकांकडून संशयित रुग्णांची नोंद करून ती तत्काळ प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल. सर्व संशयितांची 7 दिवसांमध्ये वैद्यकीय तपासणी केली जाईल. निदान निश्चित झाल्यास रुग्णास त्वरित बहुविध औषधोपचार (M D T) देण्यात येतील आणि त्यांचे फॉलो-अप नियमानुसार केले जाईल. कुष्ठरोगामुळे होणारे अपंगत्व टाळण्यासाठी लवकर निदान व उपचार महत्त्वाचे असल्याने ही मोहीम आरोग्य व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत आहे.

### प्रशिक्षण, समन्वय आणि पथकांची तयारी

अभियानाच्या यशस्वीतेसाठी पथकातील सदस्यांचे सखोल प्रशिक्षण करण्यात येत आहे. कुष्ठरोगाची चिन्हे–लक्षणे, संवेदन तपासणी, प्राथमिक निदानाचे निकष, घरभेटीदरम्यानचा संवाद, अहवाल सादरीकरण, तसेच नागरिकांशी संवेदनशील पद्धतीने संवाद साधण्याची पद्धत याबाबत मार्गदर्शन दिले जात आहे.

राज्य स्तरावर सर्व जिल्ह्यांचे नोडल अधिकारी, पर्यवेक्षक आणि कार्यक्रम व्यवस्थापकांची कार्यशाळा आयोजित करून मोहीमेचे नियोजन, अंमलबजावणी व अहवालनियम याबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा व तालुका स्तरावरही समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या असून या समित्या अभियानातील रोजच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करतील.

### जनजागृती उपक्रम

कुष्ठरोगाविषयी समाजातील गैरसमज व भीती दूर करणे हे या अभियानाचे महत्त्वाचे अंग आहे. यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि समुदाय संघटनांच्या सहकार्याने ध्वनीप्रसार, रॅली, पोस्टर्स, पथनाट्य, सामाजिक माध्यमांवरील संदेश, शाळा-महाविद्यालयांतील जनजागृती यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

### कुष्ठरोगाची महत्त्वाची लक्षणे

- त्वचेवर बधिर किंवा संवेदनशून्य चट्टे
- हातपाय सुन्न होणे किंवा बधिरपणा
- त्वचेवर गाठी/उठाव
- स्नायू कमकुवतपणा, हातपायातील विकृती

अशी कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित जवळील प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे सार्वजनिक आरोग्य विभागाने आवाहन केले आहे.

### 'नोटिफायबल डिसीज'

राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने नुकतेच कुष्ठरोगाला 'नोटिफायबल डिसीज' म्हणून घोषित केले आहे. यानुसार कुष्ठरोगाचे निदान झालेल्या सर्व रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग तसेच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणे आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

### नागरिकांच्या सहकार्याचे आवाहन

घरभेटीदरम्यान पथकांना सहकार्य करून तपासणी करून घेणे, कुठलीही माहिती दडवून न ठेवणे आणि समाजात कुणालाही लक्षणे आढळल्यास आरोग्य केंद्राकडे मार्गदर्शन करणे—हे नागरिकांचे योगदान या अभियानाच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या सहभागामुळे 2027 पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे लक्ष्य साध्य करणे शक्य होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.



# 'संवेदनेचा प्रवास'

***शाम :*** *एक तरुण आणि कष्टाळू शेतकरी.*
***राधा :*** *शाम ची पत्नी*
***डॉ. देशमुख:*** *गावातील शासकिय अनुभवी डॉक्टर.*

सूर्य नुकताच मावळला होता. शेतातील काम संपवून शाम घरी परतला. गेल्या काही दिवसांपासून त्याच्या उजव्या हातावर आणि दंडावर एक फिकट पांढरा ठिपका आला होता. तो ठिपका खाजवत नव्हता, दुखत नव्हता, पण त्याला त्या ठिपक्यावर काहीतरी वेगळे जाणवत होते.

एक दिवस घरातील सगळेच गावी गेल्यामुळे , चुलीवर पोळी भाजत असताना त्याचा हात नकळत गरम तव्याला लागला. त्याला गरम झाल्याची जाणीवच झाली नाही. "काय झाले हे?" शाम घाबरला. त्याच्या पत्नी (राधाला) गावावरुन घरी परतताच झालेला किस्सा सांगीतला. राधाच्याही लक्षात आले तो ठिपका पूर्वीपेक्षा थोडा मोठा झाला होता आणि स्पर्श केल्यावर तिथे कसलीच संवेदना होत नव्हती.

गावात कुष्ठरोगाबद्दल जुन्या, भीतीदायक गोष्टी सांगितल्या जायच्या. 'तो रोग झाल्यावर माणसे मनाने खचुन जातात,' 'तो देवाचा शाप आहे' अशा अनेक गैरसमजुती होत्या. भीतीने शामच्या मनात घर केले. त्याने त्याची भीती लपवण्याचा प्रयत्न केला, पण राधाच्या नजरेतून काही ते सुटले नाही.

"तुम्ही डॉक्टर देशमुखांना एकदा दाखवून या," राधा म्हणाली, "ते खूप चांगले आहेत आणि ते योग्य सल्ला देतील."

दुसऱ्या दिवशी, शाम धाकधूक मनात घेऊन गावातील आरोग्य केंद्रातील डॉक्टर देशमुख यांच्याकडे गेला.

डॉ. देशमुखांनी शांतपणे शामच्या हाताची तपासणी केली. त्यांनी एक लहान सुई घेऊन त्या फिकट ठिपक्यावर हलके टोचले. शामला काहीच जाणवले नाही.

"घाबरु नका शाम," डॉक्टर म्हणाले, "तुम्हाला 'कुष्ठरोग' (Leprosy) झाला आहे. पण, आजार प्रारंभिक अवस्थेत आहे आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो पूर्णपणे बरा होतो." डॉक्टरांचे हे शब्द शामसाठी आशेचा किरण होते.

"पण... डॉक्टर... लोक म्हणतात..." शामने अर्धवट बोलून सोडले.

डॉ. देशमुख हसले. "शाम, कुष्ठरोग हा देवाचा शाप नाही आणि तो फारसा संसर्गजन्यही नाही. हा फक्त 'मायकोबॅक्टेरियम लेप्रे' नावाच्या जिवाणूमुळे होतो, जसे इतर आजार होतात. तुम्ही जर नियमित औषधे घेतलीत, ज्याला 'बहुविध औषधोपचार पद्धती (MDT)' म्हणतात, तर तुम्ही अगदी सहा महिन्यांत पूर्णपणे बरे व्हाल आणि हा रोग दुसऱ्या कोणालाही पसरणार नाही."

डॉक्टरांनी शामला औषधे दिली आणि ती कशी व किती दिवस घ्यायची हे समजावले. त्यांनी त्याला हे देखील सांगितले की जर त्याने उपचार घेतले नाहीत, तरच हा रोग चेतांना (N e r v e s ) नुकसान पोहोचवून हातापायांची विकृती (deformity) निर्माण करु शकतो.

शामने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार एक वर्षाचा उपचार पूर्ण केला. दररोज न चुकता औषध घेतले. काही महिन्यांतच त्याच्या त्वचेतील संवेदना परत येऊ लागली. पांढरा ठिपका हळूहळू नाहीसा झाला.

एक वर्षाने, जेव्हा तो तपासणीसाठी डॉक्टर देशमुखांकडे गेला, तेव्हा डॉक्टर म्हणाले, "शाम, तुम्ही आता पूर्णपणे बरे झाला आहात. आता फक्त गरज आहे ती या रोगाबद्दल समाजात जागरुकता निर्माण करण्याची. तुम्ही घाबरला नाहीत, लपवले नाहीत, त्यामुळे तुम्ही पूर्णपणे सुरक्षित राहिलात."

आता शाम एकटाच बरा झाला नव्हता तर तर त्याने आपल्या मनात घर करून बसलेली भीती आणि समाजातील गैरसमज

यावरही मात केली होती. त्याने आपल्या गावातील लोकांना सांगितले की कुष्ठरोग म्हणजे काही शिक्षा नाही, तो एक सामान्य आजार आहे, जो लवकर निदान झाल्यास औषधांनी नक्कीच बरा होतो.

अजुनही आपल्या समाजात शाम सारखे बरेचशे नागरीक (स्त्री/पु) त्यांना असलेले संशयीत चटटे लपवत आहेत वेळेत तपासणीकरीता आरोग्य कर्मचारी किंवा डॉक्टरांकडे येत नाहीत  याकरीता महाराष्ट्र शासनाने संपुर्ण महाराष्ट्रात महत्त्वाकांक्षी "कुष्ठरुग्ण शोध अभियान, Leprosy case detection campaign(LCDC)"  दि. 17 नोव्हेंबर ते 02 डिसेंबर 2025 दरम्यान राबविणार आहे. नागपूर जिल्हयात मा.जिल्हाधिकारी नागपूर मा.डॉ.विपीन ईटनकर व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,नागपूर मा.श्री.विनायक महामुनी यांच्या अध्यक्षतेखाली राबविण्यात येणार आहे

**अभियानाचे मुख्य उद्देश:**

- समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली (MDT) आणणे.
- नविन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून उपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करणे व रोगाचा प्रसार कमी करणे.
- समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे.

**अभियानाची व्याप्ती व पद्धत:**

- हे अभियान 14 दिवसांचे असणार असून, जिल्हयातील 100 टक्के ग्रामीण भाग आणि शहरी भागातील जोखीमग्रस्त लोकसंख्या असणाऱ्या भागात राबविण्यात येईल.
- आरोग्य पथके घरोघर जाऊन कुष्ठरोग व क्षयरोग लक्षणांसाठी विचारणा करतील आणि घरातील सर्व सदस्यांची शारीरिक तपासणी करतील.
- महिला सदस्यांची तपासणी आशांमार्फत आणि पुरुष सदस्यांची तपासणी पथकातील पुरुष स्वयंसेवकामार्फत केली जाईल.

**संभाव्य कुष्ठरोगाची लक्षणे:**

- नागरिकांना त्यांच्या किंवा कुटुंबातील सदस्यांच्या त्वचेवर खालीलपैकी कोणतीही लक्षणे आढळल्यास त्यांनी त्वरित आरोग्य पथकांना कळवावे:
- त्वचेवर फिकट/लालसर बधीर चट्टा, त्याठिकाणी घाम न येणे.
- त्वचेवर गाठी असणे किंवा कानाच्या पाळया जाड होणे.
- हात-पायांमध्ये मुंग्या येणे, बधीरपणा किंवा जखमा असणे.
- तपासणीमध्ये संशयीत आढळलेल्या रुग्णांची 7 दिवसाच्या आत वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून तपासणी आणि त्वरित निदान निश्चित करून उपचार सुरु केले जातील

**नागरिकांसाठी आवाहन:**

कुष्ठरोग हा एक बरा होणारा आजार आहे आणि बहुविध औषधोपचारामुळे (MDT) तो पूर्णपणे बरा होतो. संसर्गाची साखळी तोडण्यासाठी आणि रोगाचा प्रसार थांबवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या मोहिमेला सहकार्य करणे आवश्यक आहे. तपासणीसाठी आलेल्या पथकातील सदस्यांना अचूक माहिती द्यावी आणि घरातील सर्व सदस्यांची तपासणी करून घ्यावी. कुष्ठरोग (Hansen's Disease) बरा होऊ शकतो. लवकर निदान आणि बहुविध औषधोपचार पद्धती (MDT) घेणे आवश्यक आहे.कोणताही भेदभाव न करता, या रोगाबद्दल जागरुकता पसरवून शारीरिक विकृती आणि सामाजिक बहिष्कार टाळता येतो.

नागपूर जिल्हयात या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संघटना, आणि नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद नागपूर  डॉ.राजकुमार गहलोत व सहाय्यक संचालक,(कुष्ठरोग) नागपूर  डॉ.विजय डोईफोडे याच्यामार्फत करण्यात येत आहे.

***अधिक माहितीसाठी संपर्क: जवळच्या आरोग्य केंद्रात संपर्क करावा.***

**महेंद्र दिगंबरराव वाघमारे**
जिल्हा विस्तार व माध्यम
अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर

# जागतिक लसीकरण दिन

**प्रस्तावना:**

आपले आरोग्य हेच आपले खरे धन आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात विविध प्रकारचे संसर्गजन्य रोग आपल्यावर सतत हल्ला करत असतात. अशा वेळी लसीकरण ही एक प्रभावी ढाल ठरते. रोग होण्याआधीच त्याचा प्रतिबंध करण्याचे सामर्थ्य लसीकरणात आहे. याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी 10 नोव्हेंबर रोजी 'जागतिक लसीकरण दिन' साजरा केला जातो.

या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे जनतेमध्ये लसीकरणाबाबत जनजागृती करणे आणि सर्व वयोगटांतील लोकांनी वेळेवर लस घेणे याची प्रेरणा देणे.

**लसीकरण म्हणजे काय?**

लसीकरण ही एक वैद्यकीय प्रक्रिया आहे ज्यात विशिष्ट रोगापासून संरक्षण देणारी लस (vaccine) शरीरात टोचून दिली जाते. त्यामुळे शरीरात त्या रोगाविरुद्ध लढणारी प्रतिकारशक्ती निर्माण होते. लसीकरण केल्याने शरीर भविष्यात त्या विशिष्ट रोगाच्या संसर्गाला सहज तोंड देऊ शकते.

**10 नोव्हेंबर – जागतिक लसीकरण दिनाचे महत्त्व:**

ही तारीख दरवर्षी WHO (जागतिक आरोग्य संघटना) आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर साजरी केली जाते.

या दिवशी विविध मोहिमा, कार्यशाळा, आरोग्य शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम राबवले जातात.

लोकांमध्ये लसीकरणाबद्दल असलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला जातो.

**लसीकरणाचे फायदे:**

- **रोगांचा प्रतिबंध:** लसीकरणामुळे पोलिओ, गोवर, तपेदिक, डांग्या खोकला, हिपाटायटिस इत्यादी रोगांपासून संरक्षण मिळते.
- **बालमृत्यू कमी होतो:** योग्य वेळी लस दिल्यास बालकांचे आरोग्य सुधारते आणि मृत्यूदर कमी होतो.
- **महामारी टाळता येते:** कोरोना काळात याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. लसीकरणामुळेच लाखो लोकांचे प्राण वाचवले गेले.
- **आरोग्यदायी समाज:** जास्तीत जास्त लोकांचे लसीकरण झाले, तर एक आरोग्यदायी समाज निर्माण होतो.
- **आरोग्यावरचा आर्थिक भार कमी होतो:** आजार न झाल्यास उपचार खर्च वाचतो.

**भारतामधील लसीकरणाचे प्रयत्न:**

भारतामध्ये लसीकरणास खूप महत्त्व दिले जाते. भारत सरकार आणि राज्य सरकारे मिळून नियमितपणे लसीकरण कार्यक्रम राबवतात.

**महत्त्वाच्या मोहिमा:**

युनिव्हर्सल इम्युनायझेशन प्रोग्राम (UIP): 1985 मध्ये सुरू करण्यात आलेला कार्यक्रम आहे. यामध्ये बालकांना आणि गर्भवती महिलांना मोफत लस दिली जाते.

**मिशन इंद्रधनुष:** 2014 मध्ये सुरू झालेला हा कार्यक्रम आहे. त्यामध्ये लसीकरणात राहिलेल्या बालकांना लस दिली जाते.

पोलिओ निर्मूलन मोहीम: 'दो बूंद जिंदगी के' या अभियानामुळे भारतात पोलिओचे उच्चाटन करण्यात यश आले आहे.

**कोविड-19 लसीकरण:** जगातील सर्वांत मोठी लसीकरण मोहीम भारताने राबवली. कोट्यवधी लोकांना मोफत लस देण्यात आली.

**लसीकरणाबद्दल असलेले गैरसमज:**

आजही समाजात काही लोक लसीकरणाबद्दल चुकीच्या

समजुती ठेवतात, जसे की:

- लसीमुळे वंध्यत्व येते,
- लस दिल्यावर आजारी पडतो,
- लहान मुलांना गरज नाही,
- नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्ती पुरेशी आहे.

हे सर्व गैरसमज आहेत. लसीकरणाचे शास्त्रीय आधारावर सिद्ध झालेले फायदे खूप आहेत. योग्य माहिती, आरोग्य कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि जनजागृती हे यावर उपाय आहेत.

**शाळा, अंगणवाड्या आणि आरोग्य सेवकांची भूमिका :**

लहान मुलांना लस वेळेवर मिळावी यासाठी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि प्राथमिक आरोग्य केंद्र महत्त्वाचे काम करतात.

शाळांमध्ये लसीकरणाबाबत माहिती दिली जाते.
अनेकदा घरोघरी जाऊन जनजागृती केली जाते.

**भविष्यातील आव्हाने आणि उपाय :**

**आव्हाने :**

ग्रामीण व आदिवासी भागातील अपुरी लस पोहोच व्यवस्था गैरसमज आणि अंधश्रद्धा आर्थिक अडचणी व लसींचा तुटवडा

**उपाय :**

सरकारने अधिक लसीकरण केंद्रे सुरू करणे मोबाइल लसीकरण युनिट्स तंत्रज्ञानाचा उपयोग - डिजिटल लसीकरण कार्ड्स प्रसारमाध्यमांतून योग्य माहितीचा प्रचार

**निष्कर्ष :**

"एक लस हजारो जीवांचे रक्षण" हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. लसीकरण केवळ एक व्यक्तीचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे आरोग्य सुरक्षित करते. 10 नोव्हेंबर जागतिक लसीकरण दिन हा दिवस म्हणजे लसीकरणाच्या महत्त्वाची जाणीव करून देणारा दिवस आहे.

या दिवसानिमित्ताने प्रत्येकाने आपले आणि आपल्या कुटुंबाचे वेळेवर लसीकरण करून घ्यावे. शंभर टक्के लसीकरण हेच निरोगी राष्ट्राचे लक्षण आहे. त्यामुळे आपण सर्वांनी मिळून "लस घ्या, सुरक्षित रहा" या संदेशाचा प्रसार करावा, हाच खरा या दिनाचा उद्देश आहे.

**संकलक :**
**डॉ. योगेश कांतीलाल शिंदे**
वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, जातेगाव ता./जि. नाशिक



# आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडून आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची पाहणी

## नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरत असलेली 102, 104, 108 सेवा अधिक सक्षम करण्याचे निर्देश

पुणे – राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी यासाठी आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या 102, 104 आणि 108 या आपत्कालीन रुग्णवाहिका सेवांच्या मध्यवर्ती सनियंत्रण कक्षाला आज राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. प्रकाश आबिटकर यांनी आज भेट देऊन पाहणी केली.

औंध उरो रुग्णालय परिसरात असलेल्या या अत्याधुनिक नियंत्रण कक्षात रुग्णवाहिका सेवांचे समन्वयन, कॉल सेंटर कार्य आणि रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये मदत पोहचविण्याचे नियोजन केले जाते. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी या कक्षातील कार्यप्रणाली, तंत्रज्ञान सुविधा, कॉल मॉनिटरिंग प्रणाली, तसेच रुग्णवाहिका प्रतिसाद व्यवस्थेचा आढावा घेतला.

या प्रसंगी त्यांनी सांगितले की, "आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा ही राज्यातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. अपघातग्रस्त, गर्भवती महिला, विषबाधा, सर्पदंश किंवा अन्य गंभीर आजारातील रुग्णांना तातडीने मदत पोहचविण्याचे कार्य ही सेवा प्रभावीपणे करत आहे. या सेवेला आणखी वेग, गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता प्राप्त व्हावी यासाठी सरकार कटिबद्ध आहे."



या सेवेअंतर्गत 102, 104 आणि 108 या टोल-फ्री क्रमांकावरून कोणत्याही वेळी – 24 तास, 365 दिवस – कॉल करून मदत मिळू शकते. कॉल प्राप्त होताच जीपीएस, जीआयएस आणि ऑटोमॅटिक व्हेईकल लोकेशन सिस्टमच्या सहाय्याने संबंधित रुग्णवाहिका काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचते. प्रशिक्षित डॉक्टर आणि ड्रायव्हर यांच्या उपस्थितीत रुग्णाला प्राथमिक उपचार देऊन त्याला जवळच्या रुग्णालयात पोहोचवले जाते.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण आणि शहरी भागांत या रुग्णवाहिका सेवांचा विस्तार करण्यात आला आहे. औंध येथील नियंत्रण कक्षातून सर्व रुग्णवाहिका 'व्हॉइस लॉगर सिस्टम' आणि 'मोबाइल कम्युनिकेशन सिस्टम'द्वारे नियंत्रित केल्या जातात. या योजनेत अॅडव्हान्स लाईफ सपोर्ट (ALS) आणि बेसिक लाईफ सपोर्ट (BLS) या दोन प्रकारच्या रुग्णवाहिका कार्यरत असून त्या अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज आहेत.

आरोग्य मंत्री आबिटकर यांनी नियंत्रण कक्षातील अधिकाऱ्यांशी संवाद साधून सेवेच्या कार्यक्षमता आणि प्रतिसाद वेळ सुधारण्यासाठी आवश्यक दिशा दिल्या. त्यांनी सांगितले की, "आपत्कालीन परिस्थितीत एका जीवाचे प्राण वाचवणे हेच या सेवेचे खरे यश आहे, आणि त्या दिशेने आपण सर्वांनी अधिक जबाबदारीने कार्य करणे गरजेचे आहे."

# सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यात शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापनेला मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई – राज्यातील शहरी आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यास 4 नोव्हेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यातील वाढत्या शहरी लोकसंख्या आणि त्यांच्या विशिष्ट आरोग्यविषयक गरजांचा विचार करता, शहरी भागातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्याची गरज व्यक्त होत होती. सध्या शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सार्वजनिक आरोग्य विभाग आणि नगरविकास विभाग यांच्यात विभागलेली असल्याने समन्वयाचा अभाव जाणवत होता. या पार्श्वभूमीवर गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




शहरी आरोग्य आयुक्तालयाच्या कामकाजाचे सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, शहरी आरोग्य हे पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. आयुक्तालयाचे प्रमुख आयुक्त (शहरी आरोग्य) हे आयएएस दर्जाचे अधिकारी असतील. नव्या आयुक्तालयामार्फत राज्यातील सर्व शहरी भागांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण, राष्ट्रीय आणि राज्य आरोग्य अभियानांची प्रभावी अंमलबजावणी, मानव संसाधनाची उपलब्धता, तसेच सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये निदान सुविधा, औषधे व उपकरणांची खात्रीशीर उपलब्धता सुनिश्चित केली जाणार आहे. तसेच, असंसर्गजन्य रोगांवर नियंत्रण, मातृत्व व बाल आरोग्य सेवा, नागरी भागातील आरोग्य कार्यक्रमांचे समन्वय, आणि खासगी आरोग्य सेवांचे नियमन या जबाबदाऱ्या देखील या नव्या आयुक्तालयाकडे असतील.

शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन झाल्यामुळे राज्यातील नगर परिषद व महानगरपालिकांमधील आरोग्य अधिकारी पदे अधिक नियमित व प्रभावी पद्धतीने भरली जातील. या निर्णयामुळे राज्यातील शहरी जनतेला अधिक सक्षम, सुसंघटित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळण्यास मोठा हातभार लागणार आहे.

**शहरी आरोग्य आयुक्तालयाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत**

- शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य समस्यांचे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाबरोबर समन्वय साधून निराकरण करणे.
- शहरी भागात राष्ट्रीय आणि राज्य आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी व आढावा घेणे.
- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाची अंमलबजावणी आणि आढावा घेणे.

- सक्रिय समुदाय सहभाग आणि आंतरविभागीय समन्वयाने शहरी भागात प्राथमिक आरोग्य सेवेचे बळकटीकरण करणे.
- सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये पुरेशा संख्येने मानव संसाधन उपलब्ध करणे
- शहरी भागात पुरेशा सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधून सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये पुरेशा निदान सुविधा, औषधे आणि उपकरणांची उपलब्धता सुनिश्चित करणे.
- आरोग्याच्या प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक सेवा सुनिश्चित करणे, विशेषतः असंसर्गजन्य रोगांचे मोफत तपासणी, प्रतिबंध आणि व्यवस्थापन करणे.
- शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व शहरी उपकेंद्राद्वारे सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवेच्या सर्व पॅकेजेसची उपलब्धता शहरी भागातील सुनिश्चित करणे.
- रुग्णालयाद्वारे आवश्यक उपचारात्मक आरोग्य सेवा नागरीकांना उपलब्ध करून देणे.
- शहरी भागामधील सर्व सामाजिकआर्थिक स्तरातील जनतेला समान आरोग्य सेवा सुनिश्चित करणे.
- खासगी आरोग्य सेवांचे विनियमन आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग घेणे.
- शहरी भागात गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र अधिनियम (लिंग निवडीस प्रतिबंध) 1994अंतर्गत सुयोग्य अंमलबजावणी निश्चित करणे.
- शहरी भागात मुंबई शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम 1949 अंतर्गत प्रकरणाची सुयोग्य कार्यवाही व अंमलबजावणी निश्चित करणे.
- शहरी भागात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना / आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेची (MJPJAY/AB-PMJAY) योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
- शहरनिहाय सार्वजनिक आरोग्य कृती आराखडा तयार करून घेणे ज्यामध्ये योग्य संदर्भसेवेसह मनुष्यबळ उपलब्धतेसह पायाभूत सुविधांचा तपशील समाविष्ट असावा.



# रक्तदान : एक जीवनदायी कार्य

रक्तदान म्हणजे दुसऱ्याच्या जीवनासाठी दिलेले एक अमूल्य वरदान होय. एखाद्या आजारी व्यक्तीला, अपघातग्रस्ताला किंवा शस्त्रक्रियेनंतर रक्ताची गरज असते आणि अशा वेळी जर योग्य वेळेस रक्त मिळाले नाही, तर जीव गमावण्याची शक्यता वाढते. अशा वेळी रक्तदान केलेले रक्त एखाद्याचा जीव वाचवू शकते. म्हणूनच रक्तदान हे केवळ सामाजिक जबाबदारी नव्हे, तर ते एक मानवतेचे प्रतीक आहे.

**रक्तदानाचे महत्त्व:**

रक्त हे मानवी शरीरातील एक अत्यंत आवश्यक घटक आहे. ते शरीरातील प्रत्येक भागाला प्राणवायू आणि पोषणद्रव्य पोहोचवण्याचे कार्य करते. जेव्हा एखाद्याचे रक्त अधिक प्रमाणात सांडते, तेव्हा त्याच्या शरीरातील जीवनप्रवाहच थांबण्याची शक्यता असते. अशा वेळी रक्तदात्यांनी दिलेले रक्त त्या व्यक्तीचा जीव वाचवते.



भारतात दरवर्षी लाखो लोकांना रक्ताची गरज भासते. अपघात, प्रसूती दरम्यान रक्तस्राव, थैलेसेमिया, कॅन्सर, अनिमिया, किंवा इतर अनेक गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वेळोवेळी रक्त लागते. मात्र, दात्यांची संख्या अपेक्षेप्रमाणे वाढत नाही. त्यामुळे रक्तसाठा कमी पडतो आणि अनेकदा वेळेवर रक्त न मिळाल्यामुळे रुग्णाचा जीव धोक्यात येतो.

**रक्तदानाबद्दल असलेले गैरसमज:**

काही लोक अजूनही रक्तदानाबद्दल अनेक गैरसमज बाळगतात. उदाहरणार्थ, रक्त दिल्यावर शरीर अशक्त होते, किंवा रक्त कमी झाले तर आजार होतो, असे अनेकांना वाटते. पण वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहता, रक्तदान केल्यावर शरीर काहीच दिवसांत नवीन रक्त तयार करते. एका आरोग्यदायी व्यक्तीसाठी दर 3 महिन्यांनी रक्तदान करणे पूर्णपणे सुरक्षित असते.

रक्तदान केल्यामुळे शरीरात कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत, उलट काही अभ्यासांनुसार नियमित रक्तदान केल्यास हृदयविकाराचा धोका कमी होतो, आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्तीही वाढते.

**रक्तदान कसे करावे?**

रक्तदान करण्यासाठी व्यक्तीचे वय किमान 18 वर्षे असावे, आणि वजन किमान 50 किलो पेक्षा जास्त असावे. रक्तदात्याचे हिमोग्लोबिन प्रमाण योग्य असणे आवश्यक असते. रक्तदान करण्यापूर्वी आणि नंतर दात्याची वैद्यकीय तपासणी केली जाते, जेणेकरून रक्तदान सुरक्षित राहील.

रक्तदानाच्या प्रक्रियेला फारसा वेळ लागत नाही फक्त 15 ते 20 मिनिटांत हे काम पूर्ण होते. त्यानंतर दात्याला काही वेळ विश्रांती आणि अल्पोपहार दिला जातो.

**रक्तदानाचे सामाजिक आणि नैतिक मूल्य:**

रक्तदान हे केवळ वैद्यकीय गरज भागवण्यासाठी नसते, तर ते समाजात सहकार्य, आपुलकी आणि माणुसकीचे मूर्त उदाहरण असते. जेव्हा आपण रक्तदान करतो, तेव्हा आपण कोणालातरी जीवन जगण्याची संधी देतो. ही एक अशी कृती आहे ज्यामुळे कोणताही धार्मिक, सामाजिक, जातीय भेदभाव न होता, शुद्ध माणुसकीचा विजय होतो.

रक्तदान हा एक असा उपाय आहे जो कोणत्याही आर्थिक

खर्चाविना दुसऱ्याला दिलेला सर्वात मौल्यवान उपहार असतो 'जीवन'.

**युवकांनी पुढाकार घेणे आवश्यकः**

आजच्या तरुण पिढीने रक्तदानाच्या बाबतीत पुढाकार घेणे गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा, विविध संस्था यांनी रक्तदान शिबिरे आयोजित करावीत आणि जास्तीत जास्त लोकांनी त्यात भाग घ्यावा. समाजमाध्यमांद्वारे रक्तदानाविषयी जनजागृती करणे, इतरांना प्रेरित करणे हे आपले कर्तव्य आहे.

**निष्कर्ष:**

रक्तदान हे निस्वार्थ, परोपकारी आणि जीवनदायी कार्य आहे. "रक्त द्या, जीवन वाचा" हा संदेश आपण सर्वांनी अंगीकारायला हवा. आज आपण दुसऱ्यासाठी रक्तदान करू शकतो, तर उद्या आपल्यालाही त्याची गरज भासू शकते. म्हणून, रक्तदान ही एक साखळी आहे – ज्यामुळे समाज एकमेकांशी जोडलेला राहतो.

आपण सगळ्यांनी मिळून हा संकल्प करावा की दरवर्षी नियमित रक्तदान करू, आणि आपल्या समाजात एक जीव वाचवणारा घटक होऊ. कारण "रक्तदात्याचे एक यशस्वी रक्तदान, कुणाच्यातरी आयुष्याचे नवीन पहाट देऊ शकते!"


**संकलक :**

**डॉ. योगेश कांतीलाल शिंदे**

वैद्यकीय अधिकारी,

प्राथमिक आरोग्य केंद्र, जातेगाव ता./जि. नाशिक




# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे

**गर्भलिंग निवड**

पोटातील गर्भाचं लिंग जाणून घेणं आणि जर ती मुलगी असेल तर गर्भपात करणं म्हणजे गर्भलिंग निवड

* गेल्या काही वर्षात गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी सर्वात जास्त वापरलं जाणारं तंत्रज्ञान म्हणजे अल्ट्रासाउंड सोनोग्राफी आणि मुलगी असेल तर नंतर गर्भपात 1980 नंतर सोनोग्राफीचं तंत्रज्ञान सर्वदूर पसरलं, परिणामी गर्भलिंग निदानात वाढ झाली आणि 0-6 वयातील मुलींची संख्या झपाट्याने खालावू लागली.

**0-6 वयोगटातील लिंग गुणोत्तर**

0-6 वयोगटातील दर हजार मुलांमागे असणारी मुलीची संख्या मोजून लिंग गुणोत्तर काढलं जातं. भारतामध्ये हे गुणोत्तर दिवसेंदिवस विषम होत आहे. 2019 मधील 920 पासून 2023 मधील 907 पर्यंत मुलींची संख्या कमी झाली आहे. जगभरातले अनुभव पाहता स्वाभाविक लिंग गुणोत्तर 150 हुन जास्त हवे. ही तफावत पाहता गर्भलिंग निदान आणि मुलीकडे केलं आणारं दुर्लक्ष यामुळे मुलींची संख्या घटत आहे हे दिसतं. जेव्हा जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर काढल आतं (दर हजार मुलांमागे जन्माला येणा-या मुलींची संख्या) तेव्हा जन्माच्या आधी केलं जाणार गर्भलिंग निदान उघडपणे कळतं. जन्माच्या वेळच्या लिंग गुणोत्तरावरुन प्रसवपूर्व गर्भलिंग निदान होत असल्याचं स्पष्ट होतं तरी, देशभरासाठी आणि जिल्हापातळीवरील आकडेवारी कळत असल्याने 0-6 वयातील लिंग गुणोत्तर जास्त प्रमाणावर मान्य केलं जात.

**गर्भलिंग निदान का होतं?**

गर्भलिंग निवड म्हणजे केवळ तंत्रज्ञानाचा गैरवापर इतकंच नाही. मुली आणि स्त्रियांना दिलं जाणारं दुय्यम स्थान आणि आयुष्यभर त्यांना सहन करावा लागणारा भेदभाव, याच्या मुळाशी आहे. समाजाची आणि कुटुंबाची पुरुषप्रधान रचना आणि मुलाचा हव्यास वा संदर्भामध्ये या प्रश्नाचा विचार करायला हवा. तसंच हुंडा आणि मुलीकडे परक्याचं धन म्हणून पाहण्याची वृत्ती यामुळेही मुलींचा विचार ओझं म्हणूनच केला जातो.

* मुलीबाबत होणार दुर्लक्ष किंवा भेदभाव अनेक प्रकारचा आहे. अपुरा आहार, आरोग्य किंवा शिक्षणापासून वंचित ठेवणं आणि कुटुंबात होणारी हिंसा, याचंच तीव्र स्वरुप म्हणजे मुली नकोशा होणं किंवा गर्भलिंगनिदानाचा वापर करुन मुलींना जन्मालाच न घालणं.

**गर्भलिंग निदानाचे परिणाम**

विषम लिंग गुणोत्तरामुळे निसर्गाचं सूक्ष्म संतुलन ढळू शकतं तर समाजाचा नैतिक ताणाबाणा बिघडून जाऊ शकतो. मुली कमी असल्या तर त्यांचा दर्जा किंवा स्थान सुधारेल हा काहींचा समज खरा नाही. उलट स्त्रियांवरील अत्याचारात भरच पडेल. बलात्कार, स्त्रियांचं अपहरण, देहविक्रय आणि एका स्त्रीशी अनेकांचा विवाह (बहुपतीत्व) या सर्वांत वाढच होऊ शकते. देशाच्या काही भागात तर आताच स्त्रिया वस्तूप्रमाणे विकत घेतल्या जात आहेत.

**गर्भलिंग निवड बेकायदेशीर आहे**

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तंत्रज्ञान (गर्भलिंग निवडीस प्रतिबंध) हा कावदा नर्भधारणेच्या व प्रसूतीच्या आधी गर्भ-लिगनिवडीला आळा घालतो, 1994 साली हा कायदा अस्तित्वात आला व 2003 मध्ये त्यात सुधारणा झाल्या. गर्भाचं लिंग जाणून घेण्यासाठी सोनोग्राफीसारख्या तंत्रज्ञानांच्या वापरावर नियंत्रणाचं काम हा कायदा करतो. काही वैद्यकीय कारणं वगळता गर्भाचं लिंग माहित करुन घेणं बेकायदेशीर आहे. पहिल्या गुन्ह्यासाठी कायद्यामध्ये 3 वर्षांपर्यंत कैद आणि 10,000 रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा आहे, अंमलबजावणीतील अडचणींमुळे आतापर्यंत फारच कमी जणांना शिक्षा झाली आहे. वैद्यकीय व्यावसायिक आणि आई-वडील वा दोघांच्या संगनमतातून गुन्हा घडत असल्याने तो सिध्द कसा करायचा हे मोठे आव्हान आहे.

**याबाबत जनजागृती**

पालक, भाऊ, बहीण, कुटुंबातील सदस्य आणि मित्र मैत्रिणी या नात्याने आपल्या प्रत्येकाचीच यामध्ये काही निश्चित भूमिका आहे. त्याचसोबत आपल्या कामाचा भाग म्हणूनही

आपण जागरूक रहायला हवं, शिक्षक, डॉक्टर, वकील, न्यायाधीश, स्वयंसेवी कार्यकर्ते, सरकारी अधिकारी, विधीज्ञ, लोकप्रतिनिधी, पत्रकार, कलाकार कुणीही असलो तरी आपण काही गोष्टी नक्की करू शकतो.

- आपल्या घरी, शेजारी-पाजारी, समाजात व कामाच्या ठिकाणी या विषयाबाबत जागरूकता निर्माण करा.
- भेदभावाचा विरोध करा. उदा. मुली आणि स्त्रियांवरील हिंसा सहन करू नका. हुंडा देऊ किंवा घेऊ नका, आणि संपत्तीत समान हक्काचा आग्रह धरा.
- आपल्या आसपास मुलगे आणि मुलींमध्ये समानता आणण्यासाठी प्रयत्न करा.
- कायद्याचं उल्लंघन होतंय असं लक्षात आल्यास समुचित अधिकाऱ्यांना कळवा. समाजात गर्भलिंगनिवडीविरोधात जागृती करणाऱ्या गटांशी जोडून घ्या. त्यांना मदत करा.
- गर्भलिंगनिवड करू नका ! त्याला मान्यता देऊ नका । आणि निमूटपणे पाहत राहू नका.

गर्भ लिंग निदान प्रतिबंध, लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्याठी आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सावजानिक आरोग्य विभागामार्फत खबरी योजना रु. 1,00,000/- बक्षीस.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी, गर्भलिंग निदान प्रतिबंध आणि स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा 1994 सुधारित कायदा 2003 (पीसीपीएनडीटी आणि एमटीपी ) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग महत्वाचे पाऊल.

या कायद्याअंतर्गत तक्रार नोंदविण्यासाठी महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल क्रमांक 18002334475/104 आहे. तक्रार नोंदविण्यासाठी तसेच संकेचे निरसन करण्यासाठी संकेतस्थळ http://amchimulgimaha.in. या संकेतस्थळावर व महाराष्ट्र राज्य पीसीपीएनडीटी टोल क्रमांकावर कोणीही तक्रार नोंदविल्यास ती तक्रार गोपनीय राहील. तक्रार देणाऱ्यास त्याची इच्छा असल्यास त्याचे नाव देखील नोंदवू शकतील.

पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत तक्रार निपटारा होऊन गर्भलिंग निदान करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होणार. तक्रारीची अंमलबजावणी होऊन जर स्त्री भ्रूणहत्या रोखण्यास यश आहे तर तक्रारदारास शासनामार्फत खबरी योजनेअंतर्गत रक्कम रुपये 1,00,000/- बक्षीस आहे.

***मुलगी वाचवा***
***प्रसवपूर्व गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा आहे.***

डॉ. संजय एम. पेरके,
जिल्हा समुचित प्राधिकारी तथा
जिल्हा शल्यचिकित्सक,



# मुख आरोग्य

**प्रस्तावना**

मुख आरोग्य म्हणजे दात, हिरड्या, जिभ, ओठ आणि तोंडाच्या संपूर्ण संरचनेचे आरोग्य होय. आरोग्यदायी मुख केवळ खाणे, बोलणे आणि हसणे यासाठीच आवश्यक नसून ते संपूर्ण शारीरिक आरोग्यासाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. मुखातील संसर्ग, किड किंवा आजार हे केवळ दातांपुरते मर्यादित नसतात; ते हृदयविकार, मधुमेह, आणि इतर अनेक आजारांवरही परिणाम करू शकतात.

**मुख आरोग्याचे महत्त्व**

- **पचनक्रिया सुधारते:** चांगले दात आणि हिरड्या अन्नाचे योग्य चर्वण करण्यास मदत करतात.
- **बोलण्यात सुस्पष्टता:** आरोग्यदायी मुखामुळे योग्य उच्चार व संवाद साधता येतो.
- **संसर्ग प्रतिबंध:** मुखातील जंतू इतर अवयवांमध्ये संक्रमण पसरू नयेत म्हणून स्वच्छता आवश्यक आहे.
- **आत्मविश्वास व सामाजिक संपर्क:** निरोगी दात व सुंदर हास्य व्यक्तिमत्त्व अधिक आत्मविश्वासपूर्ण बनवते.
- **रोगांचा धोका कमी होतो:** दंतकिड, पायरिया, तोंडाचा कर्करोग, दुर्गंधी अशा समस्या टाळता येतात.



**प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या मुख आरोग्य सेवा**

- **दंत तपासणी सेवा:** नियमित दात व हिरड्यांची तपासणी, दंतकिड, पायरिया, तोंडातील अल्सर यांचे निदान.
- **उपचार सेवा:** दात स्वच्छ करणे (Scaling), किडलेले दात भरणे (Filling), आवश्यक असल्यास दात काढणे (Extraction).
- **शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम:** विद्यार्थ्यांची दंत तपासणी व मुख स्वच्छतेबाबत मार्गदर्शन, फ्लोराइडयुक्त दंतमंजन वापराचे प्रोत्साहन.
- **जागरूकता मोहिमा:** मुख स्वच्छता दिन, दंत आरोग्य सप्ताह आयोजित करणे, तंबाखू व गुटख्याच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती.
- **संदर्भ सेवा (Referral):** गंभीर रुग्णांना जिल्हा रुग्णालयात अथवा दंत महाविद्यालयात पाठविणे.

**उपाययोजना व प्रतिबंधक उपाय**

- **स्वच्छतेच्या सवयी:** दिवसातून किमान दोनदा दात घासणे, दंतमंजन, फ्लॉस व माउथवॉशचा योग्य वापर.
- **आहार नियंत्रण:** साखरेचा व चिकट पदार्थांचा वापर कमी करणे, फळे, भाज्या, दूध यांचा समावेश करणे.
- **तंबाखूविरहित जीवन:** तंबाखू, गुटखा, पानमसाला, बीडी सिगारेट यांचा त्याग.
- **नियमित तपासणी:** सहा महिन्यांनी एकदा दंतवैद्यांकडून तपासणी करून घेणे.
- **शासकीय जनजागृती उपक्रम:** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम (NTCP), राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत मुख आरोग्य जागरूकता उपक्रम.

**निष्कर्ष**

मुख आरोग्य हे एकूणच आरोग्याचा अविभाज्य भाग आहे. तोंडातील छोटासा आजार मोठ्या आरोग्य समस्येचे कारण ठरू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने नियमित तपासणी, योग्य आहार, आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून निरोगी मुख राखावे. प्राथमिक आरोग्य केंद्राची भूमिका लोकांपर्यंत मूलभूत दंत सेवा आणि शिक्षण पोहोचविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे.

**श्री महेश उल्हास पाटील,**
आरोग्य सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र निजामपूर,
तालुका माणगाव जिल्हा रायगड
मोबाईल नंबर 9604420199.

# मानसिक आरोग्य

**प्रस्तावना**

जागतिक मानसिक आरोग्य दिन दरवर्षी 10 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटना (WHO) व वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थ (WFMH) यांच्या संयुक्त विद्यमाने या दिवसाचे आयोजन केले जाते. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे लोकांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, मानसिक आजारांबाबत असलेला गैरसमज दूर करणे व वेळेवर उपचाराची आवश्यकता पटवून देणे.

**उद्देश**

- मानसिक आरोग्याच्या महत्त्वाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे.
- मानसिक आजारांविषयीचा भेदभाव (stigma) कमी करणे.
- मानसिक विकारांचे लवकर निदान व उपचारासाठी लोकांना प्रोत्साहित करणे.
- सरकारी व बिगर-सरकारी यंत्रणांनी राबविलेल्या मानसिक आरोग्य कार्यक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोचवणे.
- "मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे" हा संदेश दृढ करणे.



**मानसिक आरोग्याची गरज**

मानसिक आरोग्य हे जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अत्यंत महत्त्वाचे आहे. मानसिक स्वास्थ्य चांगले असल्यास व्यक्तीमध्ये:

- विचार करण्याची, शिकण्याची व निर्णय घेण्याची क्षमता वाढते.
- नोकरी, शिक्षण, कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा ताण प्रभावीपणे हाताळता येतो.
- सामाजिक संबंध सुधारतात व व्यक्ती समाजात सकारात्मक भूमिका बजावते.
- नैराश्य (Depression), चिंताग्रस्तता (Anxiety), व्यसनाधीनता, आत्महत्येची प्रवृत्ती यांसारख्या गंभीर समस्यांपासून संरक्षण मिळते.

**दैनंदिन जीवनात घ्यायची काळजी**

- मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी खालील बाबी आवश्यक आहेत:
- समतोल आहार पोषक आहारामुळे मानसिक स्थैर्य टिकते.
- नियमित व्यायाम व योग तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त.
- पुरेशी झोप 6 ते 8 तास झोप मानसिक शांततेसाठी आवश्यक.
- ध्यान व प्राणायाम एकाग्रता वाढवते व चिंता कमी करते.
- सकारात्मक विचारसरणी आत्मविश्वास व आनंद वाढवते.
- • व्यसनापासून दूर राहणे दारू, तंबाखू, अंमली पदार्थ मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम करतात.
- सामाजिक संवाद राखणे मित्र, कुटुंबीय यांच्याशी संवाद मानसिक आधार देतो.
- तज्ज्ञांचा सल्ला घेणे दीर्घकाळ नैराश्य, चिंता किंवा मानसिक ताण वाटल्यास मानसोपचारतज्ज्ञ किंवा समुपदेशकांचा सल्ला घ्यावा.

**सरकारी आरोग्य संस्थेद्वारे राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना**

- भारत सरकार व राज्य शासन मानसिक आरोग्य

सुधारण्यासाठी विविध योजना राबवतात:

- राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (NMHP)
- 1982 पासून सुरू
- प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे.
- जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (DMHP)
- प्रत्येक जिल्ह्यात मानसोपचारतज्ज्ञ, मनोविज्ञानी व समुपदेशकांची नेमणूक.
- शालेय विद्यार्थी, महिलांसाठी विशेष मानसिक आरोग्य जनजागृती शिबिरे.
- आरोग्य कल्याण केंद्रे (Health & Wellness Centres)
- मानसिक आरोग्य तपासणी, समुपदेशन सेवा उपलब्ध,
- टेलि-मानसिक आरोग्य सहाय्य (Tele MANAS)
- टोल-फ्री हेल्पलाइन (14416) द्वारे 24x 7 मानसिक आरोग्य सेवा.

मानसोपचार औषधे व समुपदेशन सेवा शासकीय रुग्णालयांत मोफत उपलब्ध.

**सारांश**

***जागतिक मानसिक आरोग्य दिन हा मानसिक आरोग्याच्या महत्त्वाची जाणीव करून देणारा एक महत्वपूर्ण उपक्रम आहे. मानसिक स्वास्थ्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे असून, निरोगी समाजासाठी मानसिकदृष्ट्या निरोगी व्यक्ती आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात तणाव नियंत्रण, योग्य आहार, व्यायाम, ध्यान-योग व सकारात्मक विचार या बाबी पाळणे आवश्यक आहे. सरकारच्या मानसिक आरोग्य योजनांचा लाभ घेतल्यास अनेक गंभीर मानसिक विकारांपासून संरक्षण मिळते व लोकांचे जीवनमान उंचावते.***

**श्री. संदीप उमाकांत घायाळ,**
वरिष्ठ औषध निर्माण अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र निजामपूर,
तालुका माणगाव, जिल्हा रायगड.



# 'समुदाय विकासासाठी लोकसहभाग आणि समन्वय' यावर एकदिवसीय चर्चासत्र

पुणे - राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, समाज विकास विभाग, सेंटर फॉर ॲडव्होकसी ॲंड रिसर्च (CFAR) पुणे संचालित वस्ती संसाधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'समुदाय विकासासाठी लोकसहभाग आणि समन्वय' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आज (दि. 25 नोव्हेंबर) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाच्या दिशा सभागृहात पार पडले.

या चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या उप आयुक्त श्रीम. ममता शिंदे, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या सहायक समाजविकास अधिकारी श्रीम. पूजा पवार, पुणे महानगरपालिका सेवा केंद्र मुख्य समन्वयक श्री. दिपक कदम व श्री. सागर काशीद, सेंटर फॉर ॲडव्होकसी ॲंड रिसर्च (CFAR) चे राज्य प्रकल्प व्यवस्थापक श्री. आनंद बाखडे, वस्ती संसाधन केंद्राची टीम आणि स्वयंसेवक तसेच पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात काम करण्याऱ्या विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना वस्ती संसाधन केंद्राचे प्रकल्प व्यवस्थापक आनंद बाखडे यांनी संस्थेच्या कार्याविषयी सादरीकरण करून उद्दिष्टे व कार्यपद्धती यांची सविस्तर माहिती दिली. नागरिक आणि विविध शासकीय विभाग तसेच सामाजिक संस्थांमधील समन्वय वाढवणे, शासकीय योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, अर्ज भरण्यात सहकार्य करणे आणि योजनांमधील अडचणी





ओळखून त्यांचे निराकरण करण्यासाठी अभ्यास करणे, अशी केंद्राची कार्ये असल्याचे त्यांनी सांगितले. बचत गटांना रोजगाराच्या संधी मिळवून देऊन त्यांना सक्षम करण्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका करत आहे, त्यांच्या सोबत जोडून घेऊन अधिकाधिक नागरिकांपर्यंत योजनांची जनजागृती करण्याचा प्रयत्न वस्ती संसाधन केंद्राच्या माध्यमातून करता येईल, असे मत श्रीम. ममता शिंदे यांनी व्यक्त केले.

समुदाय विकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व, शासकीय योजनांचे प्रभावी संप्रेषण, आरोग्यविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या गरजांना प्रतिसाद देण्यासाठी समन्वय आवश्यक असल्याचे डॉ. बाविस्कर यांनी यावेळी सांगितले. या चर्चासत्रातून शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्यातील सहभागाची साखळी अधिक मजबूत होण्यास मदत होणार असल्याचे मत यावेळी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केले.

पुणे महानगरपालिकेच्या वस्ती साधन केंद्राच्या प्रतिनिधींना प्रशिक्षणाच्या माध्यमातून वस्ती संसाधन केंद्राच्या कामाशी जोडून घेता येईल आणि नागरिकांना त्या माध्यमातून योजनांशी अधिक प्रभावीपणे जोडता येईल असे मत श्रीम. पूजा पवार यांनी मांडले.

पुणे व पिंपरी चिंचवड मध्ये काम करणाऱ्या विविध संस्था या चर्चासत्रात सहभागी झाल्या होत्या ज्यामध्ये साथी सेहत, मुस्कान- फाउंडेशन फॉर चाइल्ड प्रोटेक्शन, टाटा स्ट्राईव्ह, सर्व सेवा संघ, आजीविका ब्युरो, डोअरस्टेप, आश्रय, लाईट हाऊस फाउंडेशन, कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

# कुटुंबाच्या आरोग्याची साखळी मजबूत करणारा उपक्रम केअर कम्पॅनियन प्रोग्राम (CCP)

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य उपक्रम (YosAid Innovation Foundation यांच्या तांत्रिक सहकार्याने)

आजच्या आरोग्य व्यवस्थेत उपचार आणि तंत्रज्ञानाबरोबरच माहिती, शिक्षण आणि कुटुंबाचा सहभाग हे आरोग्य परिणाम सुधारण्यासाठी अत्यावश्यक घटक ठरले आहेत. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर उपचार मिळतात, परंतु रुग्ण जेव्हा घरी परततो तेव्हा त्याची पुढील काळजी, औषधांचे पालन, स्वच्छता आणि पोषण यांचा पाया म्हणजे कुटुंब. या वास्तवावर आधारित केअर कम्पॅनियन प्रोग्राम (CCP) हा एक अभिनव उपक्रम महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम म्हणजे रुग्णालय आणि कुटुंब यांच्यातील आरोग्य शिक्षणाचा पूल आहे, जो रुग्णालयात उपचार घेत असताना कुटुंबीयांना योग्य आरोग्य मार्गदर्शन देतो, जेणेकरून रुग्णालयातून घरी गेल्यानंतरही आरोग्यविषयक काळजी व मार्गदर्शनाची साखळी अखंड राहते.राज्यातील जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, संदर्भ सुविधा रुग्णालये तसेच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना साध्या, संवादात्मक आणि दृश्य माध्यमांद्वारे प्रशिक्षण देतात.

केअर कम्पॅनियन सत्रांमध्ये मातांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र बसवून फ्लिपचार्ट, पोस्टर्स, थाळी मॉडेल, ब्रेस्ट मॉडेल, बेबी मॉडेल आणि टेकेअवे साहित्याच्या साहाय्याने माहिती दिली जाते. या सत्रांमध्ये गर्भावस्थेतील काळजी, प्रसूतीनंतरचा आहार, स्तनपानाचे महत्त्व, नवजात शिशु निगा, स्वच्छता, कुटुंब नियोजन तसेच असंसर्गजन्य आजारांविषयी (NCDs) माहिती दिली जाते. तसेच CCP अंतर्गत असंसर्गजन्य आजारांवर विशेष भर देण्यात आला आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, स्ट्रोक यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याने रुग्णालयात दाखल रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना जीवनशैलीत बदल करण्याचे महत्त्व, नियमित औषधसेवन, ताण-तणाव नियंत्रण आणि आरोग्यदायी आहार याबद्दल माहिती दिली जाते.

प्रशिक्षणानंतरही संपर्क टिकवण्यासाठी CCP WhatsApp हेल्पलाइन (1800 889 3669) सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून मातांना आणि कुटुंबांना मराठी भाषेत माता व बालआरोग्य तसेच असंसर्गजन्य आजारांवरील संदेश, शैक्षणिक व्हिडिओ नियमितपणे पाठवल्या जातात. त्यामुळे प्रशिक्षणानंतरही मार्गदर्शन सातत्याने सुरू राहते. सध्या महाराष्ट्रातील 90 हून अधिक शासकीय रुग्णालयांमध्ये हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला जात आहे आणि हजारो मातांनी व कुटुंबीयांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. केअर कम्पॅनियन प्रोग्राम हा मातृ आणि नवजात काळजीबाबत ज्ञानवृद्धी, स्तनपानाचे प्रोत्साहन आणि कुटुंबातील आरोग्यविषयक वर्तनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण घटक ठरला आहे.

CCP चा सहभाग राज्यातील विविध आरोग्य अभियानांमध्येही उल्लेखनीय आहे. दरवर्षी साजरा होणारा जागतिक स्तनपान सप्ताह (World Breastfeeding Week), राष्ट्रीय नवजात सप्ताह (National Newborn Week) अंतर्गत अनेक जिल्हा आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये CCP सत्रांचे विशेष आयोजन केले जाते. स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान (SNSPA) या अभियानांदरम्यान प्रशिक्षित परिचारिका मार्फत फ्लिपचार्ट आणि मॉडेल्सच्या साहाय्याने गर्भवती माता, स्तनदा माता व महिलांसाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे CCP सत्रे आयोजित

करण्यात आली. तसेच पोस्टर्स, टेकअवे साहित्य आणि डिजिटल माध्यमांद्वारे महिला आरोग्यासंदर्भात माहिती प्रसारित करण्यात आली. CCP सत्रांना सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा आरोग्य यंत्रणा व IEC ब्युरो यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, नागरिकांमध्ये CCP द्वारे दिलेले संदेश प्रभावीपणे पोहोचत आहेत. 2025 पर्यंत हा कार्यक्रम जिल्हा, महिला, उपजिल्हा, सामान्य व संदर्भ सुविधा रुग्णालयांमध्ये लागू झाला आहे.

आरोग्य दिन आणि आरोग्य सप्ताहच्या वेळी, संबंधित सुविधा स्तरावर उपलब्ध CCP प्रशिक्षण साहित्य (Flipcharts, Posters, Thali Model, Breast Model, Baby Model) वापरून जनजागृती सत्रे आयोजित करण्याचे आवाहन सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, नर्सिंग अधीक्षक आणि परिचारिका यांना करण्यात येते. या माध्यमातून दिलेले आरोग्य संदेश अधिक परिणामकारक ठरतात आणि नागरिकांपर्यंत स्पष्टपणे पोहोचतात.

केअर कम्पॅनियन प्रोग्राम म्हणजे केवळ प्रशिक्षण नव्हे, तर आरोग्य शिक्षण, समुपदेशन आणि कुटुंब सक्षमीकरणाची चळवळ आहे. हा उपक्रम "रुग्णालय ते घर" असा आरोग्याचा पूल बांधतो आणि "कुटुंब ते समुदाय" अशी निरोगी जीवनशैलीची साखळी निर्माण करतो. महाराष्ट्र राज्यात हा उपक्रम सशक्त माता, निरोगी बालक आणि निरामय समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक आदर्श मॉडेल ठरत आहे.

**संकेत ढोले**
राज्य कार्यक्रम व्यवस्थापक – महाराष्ट्र
केअर कम्पॅनियन प्रोग्राम (CCP)
YosAid Innovation Foundation



# मालेगावच्या प्रा.आ.केंद्र मेडशीस 'NQAS' पथकाची भेट : आरोग्य सेवेचे मूल्यांकन

वाशिम (दि.25, नोव्हेंबर) : वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र (प्रा.आ.केंद्र), मेडशी येथे दि 25 व 26 नोव्हेंबर रोजी केंद्रस्तरीय राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक मानांकन (National Quality Assurance Standards - NQAS) पथकाने भेट देऊन येथील आरोग्य सेवा आणि सुविधांचे सखोल मूल्यांकन केले.

दोन सदस्यांच्या या केंद्रीय पथकात तेलंगणा राज्यातील डॉ. भानूकुमार धारावत आणि गुजरात राज्यातील प्रशांतकुमार पटेल यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान, पथकाने प्रा.आ.केंद्र मेडशी येथे पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवेच्या गुणवत्तेची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले.

**पथकासमवेत वरिष्ठ अधिकारी उपस्थित**

या महत्त्वपूर्ण तपासणीच्या वेळी जिल्हास्तरावरील अनेक वरिष्ठ आरोग्य अधिकारी उपस्थित होते. यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. महेशचंद्र चापे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. मोबीन खान, DQAS. डॉ.सायली फुलाडी यांचा समावेश होता.

**रुग्णांच्या मुलाखतीतून सेवेची गुणवत्ता पडताळणी**

NQAS पथकाने प्रा.आ.केंद्र मेडशी येथील विविध विभागांची बारकाईने पाहणी केली. प्रामुख्याने OPD (बाह्य रुग्ण विभाग), IPD (अंतर् रुग्ण विभाग), प्रसूती कक्ष, प्रयोगशाळा, राष्ट्रीय कार्यक्रम आणि सर्वसामान्य प्रशासन या महत्त्वाच्या बाबी तपासण्यात आल्या.

यावेळी रुग्णांनीसुद्धा आपला मोलाचा सहभाग दर्शविला. पथकातील सदस्यांनी आरोग्य संस्थेत तपासणीसाठी आलेल्या गरोदर माता, इतर रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या मुलाखती घेऊन संस्थेत मिळत असलेल्या सेवेची गुणवत्ता प्रत्यक्ष पडताळून पाहिली. मुलाखत देणाऱ्या लाभार्थ्यांनी आरोग्य संस्थेचे भरभरून कौतुक केले. रुग्णांना मिळत असलेल्या आरोग्य सेवा आणि सोयी-सुविधांची गुणवत्ता पाहून पथकाने समाधानाची भावना व्यक्त केली.

**अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आशा स्वयंसेविकांचे परिश्रम**

प्रा.आ.केंद्र मेडशीला या मानांकन प्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष बोरसे यांच्यासह डॉ. शुभम सपकाळ, डॉ. ज्ञानेश्वर उखळे, डॉ. वर्षा धुमाळ, डॉ. अरिंजय बांडे, डॉ. शिरसाट, डॉ. भांडेकर, श्री. संजय काळे, श्री. संदीप नप्ते, श्रीम. नागरे, श्रीम. कळंब आणि श्रीम. सांगळे यांनी विशेष परिश्रम घेतले. आशा स्वयंसेविका, इतर आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांचेसह मेडशी गावाचे सरपंच जमीर शेख यांनी आवश्यक सहकार्य करून मूल्यांकन यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**गुणवत्तापूर्ण सेवेची अपेक्षा**

या पाहणीनंतर, N Q A S पथकाने अशाच पद्धतीने जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्था राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासक मानांकनसाठी पात्र व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली. यामुळे लोकांना जास्तीत जास्त गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळेल, असे मत पथकाने मांडले.



# कुष्ठरोग निवारण पंधरवडा : नियोजनपूर्वक कुष्ठरोगाचे उच्चाटन

**1. प्रस्तावना (Introduction)**

भारताने 2005 पासून कुष्ठरोग उन्मूलन स्तर प्राप्त केला असला तरी काही जिल्ह्यांत आजही नवीन रुग्ण आढळतात. समाजातील कलंक (Stigma), उशिरा निदान, अपुरा संपर्क-ट्रेसिंग आणि उपचारात अडथळे यांमुळे रोगाचे संक्रमण पूर्णपणे थांबले नाही.

कुष्ठरोग निवारण पंधरवडा हा दरवर्षी 30 जानेवारीपासून 13 फेब्रुवारीपर्यंत राबवला जाणारा राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य उपक्रम आहे. या कालावधीत केंद्र व राज्य शासनाद्वारे विशेष मोहीम, जागरुकता कार्यक्रम, घरगुती भेटी, रुग्ण शोध मोहीमा व समुपदेशन उपक्रम आयोजित केले जातात.

**2. उद्दिष्टे (Objectives)**

कुष्ठरोग निवारण पंधरवड्याची मुख्य उद्दिष्टे:

- नवीन रुग्णांचे शोधणे आणि त्वरित MDT उपचार सुरु करणे
- समाजातील कुष्ठरोगावरील गैरसमज आणि कलंक कमी करणे
- संपर्क व्यक्तींची तपासणी व प्रोफिलॅक्सिस (SDR) देणे
- अपंगत्व (Disability Grade 1–2) वाढ रोखणे
- PHC स्तरावर कार्यक्रमाची गुणवत्ता सुधारणे
- आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि क्षमता वाढ (Capacity Building)
- समुदाय सहभाग वाढवणे

**3. कुष्ठरोगाचे संक्षिप्त वैज्ञानिक पार्श्वभूमी (Scientific Background)** कारणकारक जीव

- Mycobacterium leprae
- वाढ खूप मंद ⊠ Incubation period 5–20 वर्षे

**संसर्ग मार्ग (Mode of Transmission)**

- प्रामुख्याने ड्रॉपलेट
- अनउपचारित मल्टीबॅसिलरी (MB) रुग्णांमधून प्रसार जास्त

**मुख्य लक्षणे**

- त्वचेवरील संवेदनाशून्य पॅच
- सुन्नपणा / टोचल्यास वेदना न जाणवणे
- नसा जाड होणे
- स्नायू दुर्बलता
- उशिरा निदान ⊠ अपंगत्व

**उपचार**

- WHO चा मल्टी-ड्रग थेरपी (MDT)
- PB: 6 महिने
- MB: 12 महिने

**4. कुष्ठरोग निवारण पंधरवड्यातील राष्ट्रीय आरोग्य धोरणे व मार्गदर्शक तत्वे**

**4.1 निक्षेपित उपाय (Key National Interventions)**

- Active Case Detection & Regular Surveillance (ACD-R)
- Leprosy Case Detection Campaign (LCDC)
- Sparsh Leprosy Awareness Campaign (SLAC)
- Nikusth Portal reporting सुधारणा
- Contact Tracing + Single Dose Rifampicin (SDR) Chemoprophylaxis
- Disability Prevention & Medical Rehabilitation (DPMR)

**4.2 राज्यस्तरीय उपक्रम (Maharashtra-specific)**

- ASHA-आधारित घरगुती सर्वेक्षण
- PHC / UPHC स्तरावर जागरुकता कार्यक्रम
- शाळास्तरावर आरोग्य तपासणी

**5. पंधरवड्यात राबवल्या जाणाऱ्या प्रमुख क्रिया (Activities during Anti-Leprosy Fortnight)**

5.1 आरोग्य सुविधा स्तर (PHC / RH / DH)

- OPD/IPD मध्ये लक्षणांची स्क्रीनिंग
- नवीन संशयित प्रकरणांची तपासणी

- Skin smear / Sensory test / Nerve palpation
- MDT औषध उपलब्धता तपासणी
- Grading of Disability (0,1,2)
- Reporting on Nikusth Portal

**5.2 समुदाय व गावपातळीवर**

- घरगुती भेटी
- गटचर्चा, स्लोगन, पोस्टर मोहीम
- ग्रामसभा मध्ये आरोग्य शिक्षण
- आशा–ANM मार्फत संपर्क तपासणी

**5.3 शाळा पातळीवर**

- विद्यार्थी स्क्रिनिंग
- शिक्षक प्रशिक्षण
- "Touch & Feel Safe" उपक्रम

**6. भूमिका व जबाबदाऱ्या (Roles & Responsibilities)**

**6.1 PHC Medical Officer**

- कार्यक्रम नियोजन
- आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवणे
- नवीन रुग्णांचे निदान आणि उपचार सुरू करणे
- अपंगत्व टाळण्यासाठी DPMR मार्गदर्शन

**6.2 Pharmacy officer (औषध निर्माण अधिकारी)**

- MDT साठा, एक्स्पायरी, रेफरन्स तपासणी
- रुग्णांना औषधाचे वेळापत्रक, साईड इफेक्ट व अनुपालन समजावणे
- Nikusth पोर्टलवर उपचार स्थिती अपडेट
- SDR Chemoprophylaxis वितरण

**6.3 CHO/ANM/MPW/ ASHA**

- घरगुती सर्वेक्षण
- संपर्क व्यक्तींची तपासणी
- रुग्णांचे follow-up
- समाजजागृती उपक्रम

**6.4 HA/LHV/BF**

Supervision.

**7. संपर्क अन्वेषण व SDR (Contact Tracing & Chemoprophylaxis)**

कुष्ठरोग नियंत्रणात SDR (Single Dose Rifampicin) अत्यंत प्रभावी उपाय ठरला आहे.

पायऱ्या:

- इंडेक्स केसची पुष्टी
- घरातील व शेजारील संपर्कांची यादी
- त्वचा व नसा तपासणी
- लक्षणे नसल्यास SDR (600 mg Adult) देणे
- नोंद व फॉलो-अप

**8. अपंगत्व प्रतिबंध उपाय (DPMR – Disability Prevention & Medical Rehabilitation)**

- Self-care किट
- डोळे/हात/पाय संरक्षण
- चप्पल (MCR Footwear) वितरण
- पुनर्वसन केंद्रांशी रेफरल

**9. सामाजिक कलंक आणि मानसिक आरोग्य (Stigma & Mental Health Issues)**

कुष्ठरोग आजही सामाजिक भीती व गैरसमजांनी वेढलेला आहे.

महत्वाची मुद्दे:

- लग्न/नोकरीच्या संधी कमी होणे
- स्वतःला वेगळं ठेवण्याची प्रवृत्ती
- नैराश्य, भीती, आत्मविश्वास कमी

समुपदेशन (Counselling) यामुळे उपचार स्वीकारण्याचे प्रमाण 70–80% वाढते.

**10. कार्यक्रमाचे मूल्यांकन (Evaluation Indicators)**

- Annual New Case Detection Rate (ANCDR)
- Prevalence Rate (PR)
- Grade-2 Disability Rate (G2D)
- Treatment Completion Rate
- Contact Screening Coverage
- SDR Coverage %

**11. आव्हाने (Challenges)**

- उशिरा निदान
- ग्रामीण आणि आदिवासी भागात कमी जागरूकता
- प्रशिक्षित स्टाफची कमतरता
- कलंकामुळे रुग्ण लपवणे
- फॉलो-अप कमी

**12. सुधारणेसाठी शिफारसी (Recommendations)**

- डिजिटल रिपोर्टिंग मजबूत करणे (Nikusth)
- ASHA प्रोत्साहन वाढवणे
- वर्षातून दोन मोठे केस-डिटेक्शन कॅम्प
- शहरी झोपडपट्ट्यांमध्ये विशेष सर्वेक्षण
- प्रत्येक PHC मध्ये MDT सुरक्षित साठा
- मानसिक आरोग्य समुपदेशन उपलब्ध करणे
- SDR चा वापर वाढवणे

**13. निष्कर्ष (Conclusion)**

कुष्ठरोग निवारण पंधरवडा हा केवळ जागरूकता कार्यक्रम नसून भारताच्या कुष्ठरोग निर्मूलन धोरणाचा अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे.

वेळीच निदान–उपचार, संपर्क तपासणी, समुपदेशन, आणि समाज जागरूकता या सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कुष्ठरोगाचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे.

**14. संदर्भ (References)**

(राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित)


- NLEP Guidelines, MoHFW
- WHO Leprosy Manual
- Nikusth Portal documentation
- DPMR Guidelines



**श्री. संदिप घायाळ**

औषध निर्माण अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र,

निजामपूर तालुका माणगाव जिल्हा रायगड.

मोबाईल नंबर- 9823664805

ई मेल sandipghayal80@gmail.com.




# जागतिक प्रतिजैविके जागरूकता सप्ताह

शरीरातील संसर्ग नष्ट करण्यासाठी प्रतिजैविकांचा वापर केला जातो. बहुतेक आजारांसाठी, असे मानले जाते की डॉक्टरांचा सल्ला न घेता कोणतेही औषध घेतल्याने ही सवय शरीराला आजारी करू शकते. हे लक्षात घेऊन, डब्ल्यूएचओ दरवर्षी 18 ते 24 नोव्हेंबर दरम्यान जागतिक प्रतिजैविके जागरूकता सप्ताह साजरा करते. वैद्यकीय सल्ल्याशिवाय कोणतेही औषध घेतल्याने होणाऱ्या संभाव्य हानींबद्दल जागरूकता निर्माण करणे हा त्याचा प्राथमिक उद्देश आहे.

जागतिक प्रतिजैविक जागरूकता सप्ताह 2025 ची थीम "आताच कृती करा: आपला वर्तमान सुरक्षित करा, आपले भविष्य सुरक्षित करा" आहे. ही थीम मानवी आरोग्य, अन्न व्यवस्था, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थांसाठी जागतिक धोका असलेल्या अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स (AMR) चा सामना करण्यासाठी आवश्यक असलेल्या तातडीच्या, समन्वित आणि क्रॉस-सेक्टरल कृतीवर भर देते.

अँटीमायक्रोबिअल औषधे, जसे की अँटीबायोटिक्स, अँटीव्हायरल, अँटीफंगल आणि अँटीपॅरासायटिक औषधे यांचा दीर्घकाळ वापर केल्याने प्रभावित भागात त्यांची प्रभावीता हळूहळू कमी होते आणि इतर अवयवांना नुकसान होऊ शकते. याबद्दल अधिक जाणून घ्या

**पाच R वर लक्ष केंद्रित करा:**

डब्ल्यूएचओ नुसार, डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय अँटीमायक्रोबिअल विशेषतः अँटीबायोटिक्स वापरू नयेत. प्रत्येक रोगासाठी औषधे वेगवेगळ्या प्रकारे लिहून दिली जातात. लिहून देताना, बहुतेक तज्ज्ञ पाच R लक्षात ठेवतात:

- Right Patient
- Right Medicine
- Right Dose
- Right Duration
- Right Time

जर या तत्त्वांवर आधारित औषध लिहून दिले तर रोगाची लक्षणे कमी होतात. तथापि, जर हे घटक लक्षात ठेवूनही अँटीमायक्रोबिअल विशेषतः अँटीबायोटिक्स लिहून दिले नाहीत, तर ज्या जीवाणूंना ते नष्ट करण्यासाठी औषध दिले जाते ते काही काळानंतर पुन्हा विकसित होऊ शकतात. याला अँटीमायक्रोबिअल रेझिस्टन्स (AMR) म्हणतात. जर हे वारंवार घडले तर अँटीमायक्रोबिअल औषधे रोगाविरुद्ध अप्रभावी ठरते.

**बऱ्याच वेळा औषधांची गरज नसते:**

जेव्हा जेव्हा एखादी व्यक्ती आजारी पडते तेव्हा ती परदेशी पदार्थ (अँटीजेन्स) सोडते. अशा परिस्थितीत, व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती अनेकदा अँटीबॉडीज तयार करते आणि औषधांची आवश्यकता न पडता हे परदेशी पदार्थ आपोआप नष्ट करते. काही प्रकरणांमध्ये, जेव्हा बरे होण्यास वेळ लागतो, तेव्हा अँटीबायोटिक्सची आवश्यकता असू शकते.

**औषधाचा शरीरावर होणारा परिणाम:**

बाह्य घटक शरीराच्या वेगवेगळ्या भागांना संक्रमित करतात, जसे की पेशी, मायटोकॉन्ड्रिया, न्यूक्लीआय आणि इतर. या घटकांच्या आधारे, प्रतिजैविकांचा प्रकार निश्चित केला जातो जेणेकरून योग्य औषध देता येईल आणि स्थिती सुधारता येईल.

**कल्चर सेन्सिटिव्हिटी टेस्ट:**

औषध घेतल्यानंतरही जर एखाद्या व्यक्तीची प्रकृती सुधारत नसेल, तर तज्ज्ञ कल्चर सेन्सिटिव्हिटी टेस्ट करण्याची शिफारस करतात. यामुळे संसर्गाचे स्रोत ओळखण्यास मदत होते.

**काळजी घ्या:**

प्रत्येक औषधाची कृती करण्याची पद्धत वेगळी असते. म्हणून, तुमच्या डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच औषधे घ्या.

नेहमी जेवणानंतर किंवा जेवणापूर्वी, 6-8 तासांच्या अंतराने अँटीबायोटिक्स घ्या, इत्यादी.

**पचनसंस्थेतील विकार:**
कोणतेही औषध घेतल्यानंतर ते पोट, लहान आतड्यातून शोषले जाऊ लागते आणि नंतर रक्तप्रवाहाद्वारे पचनसंस्थेपर्यंत पोहोचते. औषधाचा परिणाम पचनसंस्था, यकृत आणि मूत्रपिंडांवर सर्वात जास्त दिसून येतो, ज्यामुळे त्यांचे कार्य कमकुवत होते.

**रस औषधांचा वापर:**
आयुर्वेदानुसार, अनेक औषधी वनस्पती प्रतिजैविक म्हणून काम करतात. उदाहरणार्थ, रस सिंदूर आणि माल सिंदूर श्वसन रोगांसाठी वापरले जातात; रसमानिक्य, गंधक रसायण आणि आरोग्यवर्धिनी वटी त्वचेच्या रोगांसाठी वापरले जातात; आणि त्रिभुवनकीर्ती आणि आनंद भैरव रस तापासाठी वापरले जातात. ही पारा आणि सल्फरच्या मिश्रणापासून बनवलेली रस औषधे आहेत. तुळशी, आले, हळद, मंजिष्ठ, कोरडे आले आणि गिलॉय यासारख्या औषधी वनस्पती हर्बल प्रतिजैविक आहेत.

AMR ही भविष्यातील समस्या नसून, ती आजची वस्तुस्थिती आहे, जी आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करत आहे. AMR चा सामना करण्यासाठी त्वरित, सर्वसमावेशक आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याची नितांत गरज आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी सामूहिकपणे जबाबदारी स्वीकारून, प्रतिजैविकांची परिणामकारकता जपण्याचे वचन देऊया, जेणेकरून आपण आपला वर्तमान सुरक्षित करून एक निरोगी आणि टिकाऊ भविष्य निर्माण करू शकू.

**सुमित प्रभाकर पेटकर (एम.फार्मसी)**
औषधनिर्माण अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड



# यशोगाथा:
# धैर्याची दीपस्तंभ आशा स्वयंसेविका

आशा निरोगी महाराष्ट्राची

IICARE FOUNDATION द्वारे समर्थित

अहिल्यानगर जिल्ह्यात 12 वर्षांपासून प्राथमिक आरोग्य केंद्र, रुईछत्तिशी अंतर्गत शिराढोण उपकेंद्रात सेवाभावाने काम करणाऱ्या आशा स्वयंसेविका शालन सुभाष दरेकर या केवळ आशा स्वयंसेविकाच नाहीत, तर गावासाठी विश्वास, संवेदना आणि हिम्मतीचे प्रतीक आहेत. दैनंदिन कामे, घरोघरी भेटी, आरोग्यविषयक जनजागृती—हे सर्व त्या अत्यंत समर्पणाने करत असतात. परंतु, 27 मे 2025 चा दिवस त्यांच्या कार्याचा एक अमिट ठसा उमटवणारा ठरला.




सायंकाळी खडकी येथे अचानक ढगफुटी होऊन तळ्यातील प्रचंड पाणी अनियंत्रित वेगाने खाली उतरत होते. काही क्षणातच ते पाणी वाळकी–शिराढोण गावाकडे धाव घेत होते. गावातील लोक घाबरलेले, चिंताग्रस्त, कोणत्या भागातून किती पाणी येईल याचा अंदाज नसलेली परिस्थिती निर्माण झाली होती.
पण या गोंधळातही शालन ताईंचा विचार मात्र अत्यंत स्पष्ट होता. त्यांना ठाऊक होते की नदीकाठच्या शेतामधील झोपडीत तीन कोळसा कामगार काम करतात. वाढते पाणी त्यांना घेरू शकते—हे लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता हालचालीला सुरवात केली.

सर्वप्रथम त्यांनी गावच्या सरपंचांना संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. नंतर स्थानिक युवा नेतृत्वाला तातडीने घटनास्थळी पोहोचण्याची विनंती केली. संध्याकाळचे 5 वाजले होते आणि पाण्याचा वेग इतका भयंकर होता की काही मिनिटांतच शेतातील झोपडीभोवती पाणी साचले. झोपडीत बसलेले ते तिघे पूर्णपणे अडकून पडले. त्यांना ना बाहेर येता येत होते , ना कुणाला आवाज देता येत होता.

अंधार गडद होत चालला, पावसाचा जोर वाढत होता, तरीही मदतकार्य सुरूच होते. गावातील तरुणांनी आणि रेस्क्यू टीमने रात्री 10.30 पर्यंत जीवाची बाजी लावून तो बचावकार्याचा लढा चालू ठेवला. प्रत्येक मिनिट महत्त्वाचा होता, पाण्याचा प्रवाह जीवघेणा होता—पण मनात आशा ताईंची धग : "जोपर्यंत सर्वजण सुरक्षित बाहेर येत नाहीत, तोपर्यंत प्रयत्न थांबणार नाहीत!"

अखेर अथक प्रयत्नांना यश आले. अंधारात टॉर्चच्या प्रकाशात, पाण्यातून वाट काढत रेस्क्यू पथकाने त्या तिघांना सुखरूप बाहेर काढले. गावभर आनंदाची लहर उसळली. आशा ताई दूर उभ्या होत्या—ओले कपडे, दमलेला श्वास... पण चेहऱ्यावर समाधानाचा उजळलेला प्रकाश. त्यांच्या वेळीच केलेल्या सतर्कतेमुळे आणि उपस्थितीमुळे तीन जीव वाचले—ही गोष्ट कोणत्याही पुरस्कारापेक्षा मोठी.

या धाडसी आणि मानवतावादी कार्याबद्दल प्राथमिक आरोग्य केंद्र, रुईछत्तिशी येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांचा औपचारिक सन्मान केला. पण त्याहून मोठा सन्मान म्हणजे गावकऱ्यांच्या मनात निर्माण झालेला आदर.
ही यशोगाथा आहे समाजासाठी जगणाऱ्या एका आशा स्वयंसेविकेची तळमळ, संवेदनशीलता आणि अढळ कर्तव्यनिष्ठेची.



# मेळघाटात चादरची झोळी अन् खाट अंगावर घेत जंगल पार केले... मातेला पोहोचविले दवाखान्यात!

मेळघाटातील दुर्गम भागात आरोग्य कर्मचाऱ्यांनी दाखवलेले धैर्य आणि सेवा भाव खरोखरच प्रेरणादायी आहे. सौ. सरिता विजय भिलावेकर (वय 25), ही दुसऱ्या प्रसूतीची माता असून तिला रक्तदाब वाढलेला, हिमोग्लोबिन केवळ 5 ग्रॅम इतके कमी आणि सिकल सेल वाहक असल्याने दिनांक 31 ऑक्टोबर 2025 रोजी उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिला 4 पिंट रक्त देण्यात आले. दिनांक 3 नोव्हेंबर 2025 रोजी तिची प्रसूती सुखरूप पार पडली.

मात्र, 6 नोव्हेंबर रोजी ती कोणालाही न सांगता उपजिल्हा रुग्णालयातून निघून आपल्या मूळ खापरखेडा गावात गेली. तिची प्रकृती गंभीर असल्याने 8 नोव्हेंबर रोजी सादरवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका, समुपदेशक, ब्लॉक फॅसिलिटेटर आणि आशा सेविका यांनी तिच्या घरावर भेट दिली. मात्र, माता "शौचास जाते" असे सांगून घरातून निघून गेली आणि पुन्हा परतली नाही.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत तिचा शोध घेतल्यानंतर समजले की ती रत्नापूरजवळील छिंदवाडा (मध्यप्रदेश सीमा) परिसरातील जंगलात, एका शेतात लपून बसली आहे. परिसर निर्जन आणि दाट जंगलाने वेढलेला होता. तिथे रत्नापूर येथील आशा सेविका, समुदाय आरोग्य अधिकारी आणि अंगणवाडी सेविका यांनी जाऊन तिला समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु ती आरडाओरडा करून विरोध करू लागली.

9 नोव्हेंबर रोजी वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज सातणकर (प्रा.आरोग्य केंद्र कळमखार), समुपदेशक (पुरुष व स्त्री), समुदाय आरोग्य अधिकारी, आशा व अंगणवाडी सेविका, वाहन चालक आणि ब्लॉक फॅसिलिटेटर यांचा 15 जणांचा पथक जंगलातील त्या ठिकाणी पोहोचला. मातेला रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केल्यावर तिने "मला नेल्यास नदीत उडी टाकीन" अशी धमकी दिली. मोठ्या प्रयत्नांनंतर आणि समुपदेशनानंतर अखेर ती दुपारी 4 वाजता तयार झाली.
रुग्णवाहिका जिथे उभी होती तिथपर्यंत रस्ता नसल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांनी मातेला चादरच्या झुल्यात टाकून 2 किलोमीटर जंगलातून चालत नेले. मधल्या एका शेतातून खाट मिळवून तिला त्यावर झोपवले आणि डॉ. सातणकर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी आळीपाळीने खाट उचलून मातेला रुग्णवाहिकेपर्यंत आणले. नंतर तिला उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे दाखल करण्यात आले.

सध्या माता पूर्णपणे सुरक्षित असून उपचार सुरू आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा आरोग्य विभागाच्या संपूर्ण टीमने एकजूट दाखवत मातेला वाचविण्यासाठी दाखविलेल्या सेवेचा आणि समर्पणाचा हा एक प्रेरणादायी आदर्श आहे.



# ग्रामगीता
## ग्राम आरोग्य
(अध्याय १४)

श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह

**कोप करिती ते दुष्टावरि । त्यांतहि उध्दार भावचि अंतरीं ।**
**तेथे निरपराध्यांस छळती जरि । तरि त्या देव न म्हणावें ॥६॥**

## अर्थ

देवाचा कोप हा फक्त दुष्ट, पापी किंवा चुकीचा मार्ग स्वीकारलेल्या लोकांवर असतो. पण त्यातही अंतःकरणात त्यांचा उद्धार करण्याचीच भावना असते. जर एखादा तथाकथित "देव" निरपराध्यांना छळू लागला, तर त्याला खरा देव म्हणता येणार नाही. तुकडोजी महाराज येथे स्पष्ट करतात की खरा ईश्वर न्यायप्रिय असतो — तो चुकीच्या वर्तनाला आळा घालतो, पण त्यामागचा उद्देश सुधारणा आणि कल्याण असतो.

## आरोग्य जनजागृती संदेश

देव, निसर्ग किंवा समाजाचा नियम हा नेहमी न्यायावर आधारित असतो. संकटे बहुतेक वेळा चुकीच्या सवयींमुळे आणि दुर्लक्षामुळे येतात, आणि त्यांचा उद्देश सुधारणा घडवणे हा असतो. निरपराध्यांना त्रास देणे हे कधीच देवत्वाचे लक्षण नाही.

# ग्रामगीता

## ग्राम आरोग्य

(अध्याय १४)

श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह

**सर्व लोक लेकरें त्याचीं । छळणा कां करील कोणाची ?
कृति आपुलीच आपणा जाची । शत्रु आपणचि आपुले ॥७॥**

## अर्थ

सर्व लोक हे देवाचीच लेकरं आहेत. मग तो कोणाचाही छळ का करील? आपल्याच कृतींमुळे आपण संकटात सापडतो. आपल्या वाईट सवयी, चुकीचे निर्णय, आणि दुर्लक्ष हेच आपल्या दुःखांचे मूळ कारण आहे. म्हणजेच आपणच आपले खरे शत्रू आहोत.

## आरोग्य जनजागृती संदेश

देव आपला शत्रू नाही — पण आपले अज्ञान, आळस, अस्वच्छता, व्यसन, आणि बेपर्वाई आपल्याला संकटात ढकलतात. आपल्या कृतींची जबाबदारी घेतली आणि चांगल्या सवयी अंगीकारल्या, तर आपण स्वतःच आपले रक्षण करू शकतो.

# ग्रामगीता
## ग्राम आरोग्य
(अध्याय १४)

श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह

**चहूबाजूंनी केली घाण। त्यांत जंतु झाले निर्माण।**
**त्यांतूनि रोगांच्या सांथी भिन्न भिन्न। वाढ घेती ॥८॥**

## अर्थ

जेव्हा आपण आजूबाजूला सर्वत्र घाण, कचरा आणि कुजलेली वस्तू साठू देतो, तेव्हा तिथे जंतू आणि रोगकारक सूक्ष्मजीव निर्माण होतात. त्यातून विविध प्रकारचे रोग व साथी पसरू लागतात आणि हळूहळू वाढ घेतात.

## आरोग्य जनजागृती संदेश

गावात किंवा शहरात स्वच्छतेचा अभाव हा रोगांचा पहिला आणि मोठा स्रोत आहे. कचरा, सांडपाणी आणि उघडी गटारे यामुळे रोगांचा प्रसार जलद होतो.

# ग्रामगीता
## ग्राम आरोग्य
(अध्याय १४)

श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह

**नाही नेमाचा आचार । शुध्द नाही आहारविहार ।**
**अशुध्द हवापाणी, संहार । करिती जनांचा ॥१॥**

## अर्थ

जेव्हा आपण आरोग्यदायी आणि शिस्तबद्ध आचार पाळत नाही, शुद्ध व पौष्टिक आहार घेत नाही, आणि स्वच्छ जीवनपद्धती ठेवत नाही, तेव्हा आजूबाजूची हवा व पाणी देखील अशुद्ध होते. अशा दूषित वातावरणामुळे लोकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो, आणि त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो.

## आरोग्य जनजागृती संदेश

शिस्तबद्ध दिनचर्या, स्वच्छ व संतुलित आहार, आणि स्वच्छ हवा-पाण्याचे संरक्षण हे आरोग्यासाठी आवश्यक आहे. अस्वच्छ पाणी, दूषित हवा आणि अस्वच्छ जीवनशैली या रोग आणि मृत्यूचे प्रमुख कारण आहेत.

# ग्रामगीता
## ग्राम आरोग्य
(अध्याय १४)

श्लोक, अर्थ व आरोग्य जनजागृती संदेशासह

**कांही केव्हा कुठेहि खाणें । कधी झोपणें कधी जागणें ।
सप्तहि धातु कोपती याने । रोगरूपाने फळा येती ॥१०॥**

## अर्थ

कधीही, कुठेही आणि काहीही खाणे, झोपेची अनियमित वेळ, उशिरापर्यंत जागरण, अशा अव्यवस्थित सवयींमुळे शरीरातील सात धातू (रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र) असंतुलित होतात. परिणामी शरीरात विविध प्रकारचे रोग निर्माण होतात.

## आरोग्य जनजागृती संदेश

अयोग्य आहार, अनियमित झोप, आणि अव्यवस्थित जीवनशैली ही आजारांची मुळे आहेत. शरीराची तंदुरुस्ती टिकवायची असेल तर वेळेवर जेवण, पुरेशी झोप, आणि संतुलित आहार पाळणे आवश्यक आहे.

# क्षयरुग्णांच्या मदतीसाठी आयोजित निक्षय गीत मैफिलीस प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

कोल्हापूर – कोल्हापूरने राज्यात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता 'माझं कोल्हापूर, क्षयमुक्त कोल्हापूर'साठी नागरिकांनी आपले योगदान द्यावे तसेच आम्ही क्षयमुक्त कोल्हापूर करण्यासाठी विशेष प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले.

जाणीव फाउंडेशन द्वारे राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या 'निक्षय गीत मैफिल' च्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर कार्तिकेयन एस., प्रशांत जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. ते म्हणाले, "क्षयरुग्णांनी क्षयरोग पसरु नये याची दक्षता घ्यावी तसेच नागरिकांनी घाबरुन जावू नये. प्रशांत जोशी यांनी त्यांच्या संस्थेमार्फत क्षयरोग मुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली आहे.



यावेळी आजपर्यंत केलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल सौ.शर्मिला मोहिते, ज्येष्ठ वास्तू विशारद शिरीष बेरी,मुख्य संपादक, बी न्यूज माननीय चारुदत्त जोशी यांचा विशेष सन्मान जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात तीन क्षयरुग्णांना पोषण आहार किट देण्यात आले.

देशामध्ये प्रथमच राबविण्यात येणारा हा नावीन्यपूर्ण उपक्रम फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून 365 दिवस सूरु आहे. हा 'निक्षय गीत मैफिल' उपक्रम अधिक लोकाभिमुख करण्यासाठी 7 नोव्हेंबर 2025 रोजी राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन येथील मुख्य सभागृहामध्ये गीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. संगीताच्या सुरांनी सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या उद्देशाने जाणीव फौंडेशन, यमुनाताई पाटील चॅरिटेबल ट्रस्ट आणि प्रतिज्ञा नाट्यरंग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हर्षला वेदक यांच्या सहकार्याने शब्द योगी कवयित्री शांता शेळके यांच्या सुश्राव्य गीतांची 140 वी 'निक्षय गीत मैफल ' राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित करण्यात आली होती.

या मैफिलीच्या आयोजनातून जमा होणाऱ्या ऐच्छिक निधीतून क्षयरुग्णांना पोषण आहार कीट देऊन मदत केली जात आहे.या गीत गायन मैफलीसाठी अमरसिंह राजपूत,गणेश जाधव, प्रिती देसाई, प्रसन्न कुलकर्णी, मंजिरी लाटकर, नीलंबरी जाधव, जयश्री देसाई यांनी आपल्या सुश्राव्य गायनाने शब्दयोगी श्रीमती शांताबाई शेळके यांच्या रचनांना पुरेपूर न्याय दिला. यावेळी जयश्री देसाई व अश्विनी टेंबे यांनी तितकेच रसाळ निवेदनाच्या मध्यमाधातून कवयित्री शांता शेळके यांचा जीवनपट उलगडून दाखविला.या कार्यक्रमासाठी रसिक प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

या कार्यक्रमाचे संयोजन प्रशांत जोशी व राजेद्र चौगले यांनी केले. ध्वनी संयोजन रमेश सुतार, अभिजित माळगे यांनी केले तर नेपथ्य सागर भोसले, संदीप माने, संताजी पाटील यांनी केले. या कार्यक्रमावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, वैद्यकीय अधिकारी – डी.टी.सी. डॉ. माधव ठाकूर, प्रतिज्ञा नाट्यरंग संस्था स्नेहसंगीत प्रतिज्ञाचे श्री. प्रशांत जोशी, मिलिंद नाईक, यमुनाताई पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे राजेद्र चौगले, जाणीव फाउंडेशनच्या सुषमा बटकडली, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर डॉ. माधव ठाकुर, एकनाथ पाटील व प्रेक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आईच्या उदरात वाढणाऱ्या जगाला स्पर्श करणारा एक दिवस ....

सार्वजनिक सेवेतील आरोग्य मंदिरे म्हणजे पवित्र आरोग्य सेवेच केंद्र..

शहापूर तालुक्यातील प्रा.आ.केंद्र टेम्भा येथे बुधवार, दि. 26 नोव्हेंबर 2025 रोजी घडलेलं दृश्य...हा दिवस साध्या गावातला साधा दिवस नव्हता. या केंद्रात गरोदर मतांसाठी डोहाळे जेवण व ओटी भरण्याचा अविस्मरणीय उत्सव नव संकल्पनेतून पार पडला...

मातृत्वाला मान, पोषणाला दिशा आणि सुरक्षित प्रसूतीची खात्री –

हे सगळं एकत्र येऊन उत्सवासारखं फुललं.



या कार्यक्रमात डोहाळे जेवण व ओटी भरणा फक्त पारंपरिक समारंभ नव्हता,

तो होता आई होणाऱ्या प्रत्येक स्त्रीचा सन्मान.

राफा लाईव्ह बियाँड फाऊंडेशन, ग्रामीण विभाग वैद्यकीय सेवा संस्था आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उत्साहातून 43 मातांचे औक्षण, पोषण आणि आश्वासनाने स्वागत झाले.

आहाराचे प्रात्यक्षिक प्रेमाने, घरगुती हातांनी आरोग्यसेविकांनी स्वतः घरी बनवलेल्या पौष्टिक पदार्थांचे प्रात्यक्षिक करून

गर्भवती मातांना सांगितलं ...“रुग्णालयं, योजना, औषधं–हो, महत्वाची आहेत...पण आईच्या पानावरची हिरवी भाजी, गुळ-शेंगदाणे आणि फळं याच बाळाचं पहिलं पोषण आहेत.”

त्यांच्या हातच्या डाळीं, लाडू, भाज्या

केवळ चवीने नाही–काळजीने भरलेल्या होत्या .दोन मातांचे शब्द या कार्यक्रमाचा आत्मा ठरला

श्रीमती यज्ञा योगेश घरत म्हणाल्या “शासकीय दवाखान्यात मिळणारी काळजी, सुविधा इतकी चांगली...

मग आम्ही पैसे खर्च करून खाजगी रुग्णालयात का जावं?

आमचं मूल इथेच सुरक्षित, सेवेत वाढेल.”

**श्रीमती रविना रविनाश तुपांगे यांचा आवाज थरथरत होता “गरीब आईला असं सुंदर कार्यक्रम कसा परवडणार?**

पण आज आम्हाला मिळालं जे कधी कल्पनाही केली नव्हती...

हे फक्त जेवण नव्हतं–ही होती सन्मानाची थाळी.”

या दोन स्त्रियांनी सांगितलेलं सत्य

त्या दिवशी उपस्थित प्रत्येकाच्या मनात खोलवर उतरलं.

उपस्थिति, सहभाग आणि स्पर्श या कार्यक्रमात सहकार्य करणारे

डॉ. रमेश राठोड, डॉ. कौशल पाटील, PHN अश्विनी जाधव,डॉ. माधव वाघमारे, संजय पाटील, जयवंत विशे, वर्षा खैरनार,

प्रा.आ.केंद्रातील सर्व कर्मचारी, आशा ताई,तसेच राफा लाईव्ह बियाँड फाउंडेशनचे अध्यक्ष भास्कर नाडर,डॉ. स्नेहा रेड्डी व टीम –

यांच्या एकत्र प्रयत्नांतून मातृत्वाचा हा सोहळा पार पडला.

43 महिलांना साडी व जेवणाचा लाभ देण्यात आला–पण सर्वात मोठा लाभ होता विश्वासाचा.

आईंना सांगण्यात आलं “तुमचं मातृत्व आमची जबाबदारी आहे.

प्रसूती सुरक्षित, प्रसव संस्था आधारित –हेच तुमच्या आणि बाळाच्या आरोग्याचं भविष्य.”

एका दिवसाने 43 आईंच्या थाळीत अन्न भरलं,पण त्याहून महत्वाचं –

त्यांच्या मनात भरलेला विश्वास.

आरोग्य सेवेसाठी चाललेली धाव, सुविधा, मोहिमा–हे सगळं शास्त्र आहे.पण आईच्या हातावर औक्षण ठेवणं,तिच्या डोळ्यातलं पाणी पाहणं,तिला "तू सुरक्षित आहेस" असं सांगणं–हीच खरी सेवा.

हे फक्त डोहाळे जेवण नव्हतं.

हे आरोग्य व्यवस्थेचं हृदय होतं.

अशी असंख्य हृदय सार्वजनिक आरोग्य सेवेत जोपर्यंत धडधडत राहतील तोपर्यंत सार्वजनिक आरोग्य सेवा जीवनाच्या प्रत्येक श्वासापर्यंत जिवंत आहे... आणि राहील ...

# आशा कौशल्य विकास कार्यक्रम

## सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे ऑक्टोबर २०२५

| अ. क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे | कल्याण | दहागाव | श्रीमती निशा संभाजी पतंगराव | ३७.५ |
| २ | | रायगड | पोलादपुर | पळचिल | श्रीमती निता किरण पवार | ३५ |
| ३ | | पालघर | मोखाडा | वाशाळा | श्रीमती तारा सुरेश पाटेकर | ३७ |
| ४ | नाशिक | नाशिक | दिंडोरी | तळेगांव दि | श्रीमती. आश्विनी राजेंद्र गांगुर्डेश | ३० |
| ५ | | धुळे | शिरपुर | होळनांथे | श्रीमती मंगला संजय कोळीश | ३८ |
| ६ | | नंदुरबार | नंदुरबार | ढेकवद | श्रीमती कल्पना जालमसिंग | ३३ |
| ७ | | जळगाव | अमळनेर | मारवड | श्रीमती वंदना विनायक पाटील | ३९ |
| | | अहिल्यानगर | श्रीगोंदा | बेलवंडी | श्रीमती जय संजय दरवडे | ३९ |
| ९ | पुणे | पुणे | भोर | अंबवडे | श्रीमती सुषमा धनाजी तावरे | ४० |
| १० | | सातारा | सातारा | चिंचणेर वंदन | श्रीमती शुभांगी मधुकर पाटील | ३९ |
| ११ | | सोलापूर | बार्शी | उपळे दुमाला | श्रीमती सुजाता संजय कसब | ३९ |
| १२ | कोल्हापूर | कोल्हापूर | चंदगड | कोवाड | श्रीम. भरता जयनाथ नाईक | ४० |
| १३ | | सांगली | शिराळा | मांगले | श्रीमती सुनीता संभाजी खोत | ३९ |
| १४ | | सिंधुदुर्ग | अप्राप्त | | | |
| १५ | | रत्नागिरी | मंडणगड | पणदेरी | श्रीमती विशाखा विश्वनाथ शेडग | ३९ |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | फुलंब्री | बाबरा | श्रीमती गंगा जंगले | ३६ |
| १७ | | जालना | अप्राप्त | | | |
| १८ | | परभणी | परभणी | सोनपेठ | श्रीमती.रमा दिपक व्हाहळे | ३५ |
| १९ | | हिंगोली | औंढा ना. | पिंपळदरी | श्रीमती सोनाली दत्तराव खंदार | ४० |
| २० | लातुर | लातुर | अप्राप्त | | | |
| २१ | | धाराशिव | अप्राप्त | | | |
| २२ | | बीड | शिरुर कासार | शिरुर कासार | श्रीमती.निता भास्कर सानप | ३९ |
| | | नांदेड | कंधार | पानशेवडी | श्रीमती अर्चना साहेबराव जोंधळ | ४० |
| २४ | अकोला | अकोला | अकोला | आपातापा | शितल विकास डोंगर | ३९ |
| २५ | | वाशिम | मंगरुळपीर | कासोळा | श्रीमती पुजा मनोज गिऱ्हे | ३८ |
| २६ | | अमरावती | वरुड | पुसला | श्रीमती सुनंदा सचिन बोंडे | ३६ |
| २७ | | यवतमाळ | दिग्रस | हरसुल | श्रीमती.लक्ष्मी साहेबराव हागवणे | ३३ |
| २८ | | बुलढाणा | मलकापूर | उमाळी | श्रीमती जयश्री निरज जैस्वाल | ३७ |
| २९ | नागपूर | नागपुर | नरखेड | मेंढला | श्रीमती अर्चना प्रभाकर सलाम | ३६ |
| ३० | | वर्धा | समुद्रपुर | मांडगाव | श्रीमती.रुशाली गणेश नौकरकार | ३९ |
| ३१ | | भंडारा | साकोली | एकोडी | श्रीमती उत्तरा लक्ष्मण लांडगे | ३९ |
| ३२ | | गोंदिया | तिरोडा | बेरडीपार | संगिता रविंद्र पटले | ३४ |
| ३३ | | चंद्रपूर | चंद्रपूर | घुग्घूस | श्रीमती सिमा मुन्ना गेडाम | ४० |
| ३४ | | गडचिरोली | अप्राप्त | | | |

## कविता

# || कुष्ठरोग शोध अभियान ||

कुष्ठरोग शोध मोहिम आली,
आरोग्याची नवीच कळी फुलवूया.
१७ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत,
तपासणी करून सुरक्षित राहूया. १

चला चव्ह्याची तपासणी करू या,
कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र घडवू या. धृ

लक्षणे दिसली तर घाबरू नका,
डॉक्टरांना त्वरित दाखवूया.
वेळीच निदान झाल्यावर,
सहज व मोफत उपचार घेऊया. २

चला तपासणी करू या,
कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र घडवू या. धृ

आपण स्वतः तपासणीसाठी येऊन,
आजाराचा वेग थांबवूया.
आपला सहभाग आहे महत्त्वाचा.
निरोगी आपला महाराष्ट्र बनवूया, ३

चला तपासणी करू या,
कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र घडवू या. धृ

चला सर्वांनी एकत्र येऊन,
आरोग्याची ज्योत पेटवूया.
कुष्ठरोग मुक्त महाराष्ट्रासाठी,
मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवूया. ४

चला तपासणी करू या,
कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्र घडवू या. धृ

डॉ. अंकुश वसंतराव मानकर
समुदाय आरोग्य अधिकारी
आयुष्मान आरोग्य मंदिर रेवसा
अमरावती

## कविता

# || चिमुकल्यांचे पोषण - पोषण दूत ||

चिमुकल्या रडतात, पोट रिक्त, हात लहान,
छोट्या स्वप्नांच्या वाटा अंधारात हरवतात ।
आईच्या मिठीतही जरा उब नाही.....
अन्नाच्या ओघातही जीवन थकलेले।

गंभीर कुपोषणाचा काळ सावतो अंगावर,
शरीर नाजूक, मन ढळलेले, आवाज ऐकतो का कोणी?
पण पोषण दूताची पाऊले जिथे पडतात.....
तेथे स्वप्न फुलतात, हस-या चेह-यांवर उजेड उगवतो।

दूधाचा थेंब, अन्नाचा आधार, प्रेमाची झाक,
ही फक्त गरज नाही, हक्क आहे, हसण्याचा अधिकार आहे।
आई-वडिलांनो, काळजीने पाहा....
छोट्या प्राणांना द्या ताकद, द्या आशेचे पंख।

चिमुकल्यांचे हसरे जीवन जपू
गंभीर कुपोषण दूर करू,
पोषण दूत सोबत....
नवे दिवस फुलवू, नवे स्वप्न उंचावू।

**डॉ. कोमल योगेश देसले (एम.बी.बी.एस.)**
**वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र लहवित**

# कविता

## || नवचेतना ||

कधी ओला दुष्काळ,
कधी कोरडा दुष्काळ,
आपत्तीचे आहेत प्रकार फार.
कधी दुःख कधी नैराश्य,
कधी वाढलेली चिंता फार.

अंधकाराला दूर करून,
तेजाकडे गेलंच पाहिजे.
नैराश्याला दूर करून,
सर्व सुरळीत केलंच पाहिजे.

सकारात्मक दृष्टिकोन हा आहे मंत्र छान,
योग, ध्यानधारणा, सचेतनता, योग्य आहार,
समुपदेशन, योग्य उपचार,
हे तर आहेत मार्ग छान.

निसर्गाने केला आहे घात,
आपण करू शकतो त्यावर मात.
एकत्र येऊन करू आपण सर्वांचा पुनर्वसन,
पुन्हा जोमाने उभा राहू देऊ निसर्गाला उत्तर.

**सरस्वती बाबुराव दराडे**
(पाठ्य निर्देशिका)
शासकीय परिचर्या महाविद्यालय,
बारामती

# कोल्हापूर जिल्हा क्षयमुक्त करण्याचा संकल्प

## आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते ९४ ग्रामपंचायतीच्या सरपंचांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान

गारगोटी - सन 2030 पर्यंत संपूर्ण भारत टी. बी. मुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. या अंतर्गतच 'माझं कोल्हापूर क्षयमुक्त कोल्हापूर' ही संकल्पना घेऊन संपूर्ण जिल्हा टी. बी. मुक्त करण्याचा संकल्प केला आहे. जिल्ह्यातील आजरा भुदरगड आणि राधानगरी तालुक्यातील 94 ग्रामपंचायती या पूर्णतः क्षयमुक्त झाल्या आहेत. या ग्रामपंचायतीबरोबरच संपूर्ण जिल्हा लवकरच क्षयमुक्त करण्यात येईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

येथील इंजूबाई सांस्कृतिक भवनात आयोजित टी. बी. मुक्त ग्रामपंचायत 2024' पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री आबिटकर यांच्या हस्ते निक्षय पोषण आहार किटचे वाटप तसेच आजरा, राधानगरी व भुदरगड तालुक्यातील सुमारे 94 ग्रामपंचायतीच्या सरपंचांचा महात्मा गांधी यांचा पुतळा, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, नागरिकांनी टीबीची अनावश्यक भीती बाळगू नये. 94 गावातील सरपंचांचा सत्कार झालेला सत्कार ही अत्यंत कौतुकाची व अभिमानास्पद बाच आहे. जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी ग्रामविकासासाठी मतभेद विसरून एकत्रित येवून काम करावे. ग्रामविकास कार्याला आपण सर्वतोपरी सहाय्य करू. तसेच राज्यात, जिल्ह्यात योग संस्कृती वाढली पाहिजे.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आनंद वर्धन यांनी प्रास्ताविक केले. आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, गटविकास सुभाष सावंत, डॉ. संदीप भंडारे, डॉ. शेखर जाधव, कल्याण निकम, डॉ. अमोल पाटील, शिवाजी चौगुले यांच्यासह विविध पदाधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.





# आयुष्मान कार्ड निर्मिती व वितरण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

मुंबई – राज्य शासनाने विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्मान कार्ड निर्माण व वितरण करणाऱ्या क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. 4 नोव्हेंबर 2025 रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

1 जुलै 2024 पासून एकत्रितपणे राबविण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत सुमारे 12.74 कोटी लाभार्थ्यांना विनामूल्य आरोग्य सेवा दिली जाणार आहे. लाभार्थ्यांची ओळख आणि उपचार नोंदणीसाठी आधार संलग्न आयुष्मान को-ब्रँडेड कार्ड तयार व वितरित केली जात आहेत. राज्यात आतापर्यंत 3.44 कोटी लाभार्थ्यांची को- ब्रँडेड आयुष्मान कार्डे तयार झाली असून उर्वरित 9.30 कोटी कार्डे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्ड निर्मिती आणि वितरणात कार्यरत अशा कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहनासाठी मानधन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता प्रत्येक यशस्वी केवायसीसाठी रु. 5 ऐवजी रु. 20 आणि कार्ड वितरणासाठी रु. 3 ऐवजी रु. 10 असे एकूण रु. 30 मानधन देण्यात येईल. या निर्णयामुळे सुमारे 204.06 कोटी रुपयांचा खर्च होणार असून ही रक्कम आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत 2025–26 या आर्थिक वर्षातील तरतुदीतून करण्यात येईल. हा निर्णय 4 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर झाला असून राज्यातील आरोग्य हमी योजनेची अंमलबजावणी अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करण्यास यामुळे मदत होणार आहे



भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ नर्सिंग, धनकवडी पुणे येथील बीएस्सी नर्सिंगच्या तृतिय वर्षातील 59 विद्यार्थ्यांनी 4 शिक्षकांसह बुधवार दिनांक 4 नोव्हेंबर 2025 रोजी राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे कार्यालयाला शैक्षणिक भेट दिली. यावेळी आरोग्य संवादाअंतर्गत राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर व विभागाचे सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार यांनी उपस्थितांना विभागाच्या सविस्तर कामकाजासह 'सामाजिक व वर्तनात्मक बदल संवाद' या विषयावर सखोल माहिती दिली.

# कोल्हापूर जिल्ह्यातील विविध आरोग्य सेवांचा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला आढावा



कोल्हापूर, दि. 27 ऑक्टोबर - सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापूर येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हास्तरीय विविध आरोग्य सेवांचा आज आढावा घेतला.

आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली घडलेल्या या बैठकीत त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील विविध आरोग्य सेवांचा सखोल आढावा घेतला. विशेषतः महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आरोग्य शिबिरे, रुग्णालयातील स्वच्छता व आहार सेवा, तसेच अत्यावश्यक औषधांची उपलब्धता या विषयांवर यावेळी चर्चा झाली. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कामकाजाचा आढावा घेण्यात आला. शवविच्छेदन गृह व्यवस्था, शवागर व मनुष्यबळाची उपलब्धता, जिल्ह्यातील पाणीस्त्रोत तपासणी मोहिमेचे नियोजन, तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबतच्या भरती नियोजनावर देखील या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

कोल्हापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, सीपीआर हॉस्पीटल, कोल्हापूर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कोल्हापूर, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे समन्वयक या बैठकीला उपस्थित होते.

आरोग्य मंत्री आबिटकर यांनी जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि जनहिताभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.



# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: ddhsiec.creatives@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास डिजाईनचे काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### डिसेंबर २०२५

| | |
|---|---|
| १ डिसेंबर | जागतिक एड्स प्रतिबंध दिन |
| २ डिसेंबर | भोपाळ दुर्घटना दिन/राष्ट्रीय प्रदूषण प्रतिबंध दिन |
| ३ डिसेंबर | जागतिक दिव्यांग दिन |
| ९ डिसेंबर | जागतिक रूग्ण सुरक्षा दिन |
| ११ ते १७ डिसेंबर | सिकलसेल जनजागृती सप्ताह |
| १२ डिसेंबर | सार्वत्रिक आरोग्य उपलब्धता दिन |

### जानेवारी २०२६

| | |
|---|---|
| १२ जानेवारी | राष्ट्रीय युवा दिन |
| ३० जानेवारी | कुष्ठरोग निवारण दिन |
| ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी | कुष्ठरोग निवारण पंधरवडा (स्पर्श अभियान) |

### फेब्रुवारी २०२६

| | |
|---|---|
| ४ फेब्रुवारी | जागतिक कर्करोग दिन |
| ५ फेब्रुवारी | मौखिक आरोग्य दिन |
| १० फेब्रुवारी | राष्ट्रीय जंतनाशक दिन |
| ११ फेब्रुवारी | जागतिक रुग्ण दिन व जागतिक युनानी दिन |
| १२ फेब्रुवारी | प्रजनन आरोग्य जागरूकता दिन |

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, येरवडा,
पुणे 411006

# मानसिक आरोग्यासाठी राज्यात लवकरच विशेष पथदर्शी प्रकल्प राबविणार आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची माहिती



मुंबई - बदलत्या जीवनशैलीमुळे नागरिकांमध्ये मानसिक ताणतणाव वाढत असून, मानसिक आरोग्य या विषयावर अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. हीच गोष्ट लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभाग लवकरच राज्यभरात एक विशेष पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

मानसिक आरोग्याच्या विषयावर काम करणाऱ्या "पॉवर ऑफ वर्ड्स अकॅडमी" या संस्थेच्या प्रतिनिधींसोबत आबिटकर यांची आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत अलीकडच्या काळात सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढत असलेल्या ताणतणावाच्या समस्येवर विस्तृत चर्चा करण्यात आली. अनेकदा लोक व्यक्त होत नाहीत. त्यामुळे तणाव वाढतो. त्याचे मानसिक आजारात रूपांतर होऊ शकते. त्यामुळे नागरिकांच्या भावना समजून घेत, त्यांचे मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी एक विशेष पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

आशा स्वयंसेविका आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असल्याने पहिल्या टप्प्यात आशा सेविकांना प्रशिक्षण देऊन हा प्रकल्प राबवता येईल का? याची चाचपणी या बैठकीत करण्यात आली. या बैठकीस पॉवर ऑफ वर्ड्स संस्थेच्या स्टेफी बाऊ, देबोरा पंडित- सवाफ, श्री. गुरु सावले, श्री. विनीत जैन, डॉ. मयूर दुबे, श्री. मनप्रीत, आरोग्य सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत आदी मान्यवर उपस्थित होते.



Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 24th November 2025



# लसीकरण - संरक्षणाचं वचन !

## आज लसीकरण करा,
## आपले आणि बाळाचे भविष्य सुरक्षित करा

Monthly Maharashtra Arogya Patrika is published by
Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra at
Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.